मासिक वार्तापत्र • अंक 17• मार्च 2021 • सहयोग मूल्य - रु. 5 • 12 पाने

कामगार बिगुल

नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक



बांधकाम कामगारांच्या नोंदणीचा फार्स 3

पॅरिस कम्युन: पहिल्या मजूर राज्याची सचित्र कथा 8

1946 सालचे नाविकांचे बंड 4

# जनतेला लुटून भांडवलदारांचे खिसे भरण्याचे काम वेगाने सुरू

## मोदी सरकारचा खाजगीकरणाचा अभुतपूर्व रेटा; काँग्रेस आणि इतर सरकारांचे विक्रम मोडीत!

'अर्थव्यवस्था' या शब्दाचा अर्थ फक्त भांडवलदार वर्गाचा नफा आहे हे पुन्हा एकदा सिद्ध करत मोदी सरकारने, अगोदरच्या वाजपेयी आणि यु.पी.ए. सहीत सर्व सरकारांचे विक्रम मोडीत काढत, जनतेची संपत्ती ऐतखाऊ भांडवलदार वर्गाच्या घशात घालण्याचे काम वेगाने पुढे चालवले आहे. 2021 च्या अर्थसंकल्पासहित इतर अनेक निर्णयांद्वारे बँका, विमा क्षेत्र, सागरी वाहतूक क्षेत्र, स्टील, रस्ते, खते, वीजवहन, गॅस, इंधनतेल, रेल्वे, विमानतळ, खेळाची मैदाने असे सर्व काही विकायला काढले आहे. कोरोना काळात देशभरातील जनतेचे धिंदवडे निघाले, कोट्यवधी बेरोजगार झाले, भुकेने बेजार झाले, महागाईने कंबरडे मोडले, परंतु या सर्वांना ठेंगा दाखवत, 'अर्थव्यवस्था' सांभाळण्याच्या नावाखाली मोदी सरकार फक्त आपल्या मालकांसाठी म्हणजे भांडवलदार वर्गासाठीच आदबत आहे!

### बँकांचे खाजगीकरण

बजेटच्या भाषणात अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी दोन बँकांसहित जनरल इंश्युरंस कंपनी आणि एल.आय.सी. च्या खाजगीकरणाचा इरादा जाहीर केला. यातून 1.75 लाख कोटी रुपये उभे करण्याचा त्यांचा इरादा आहे. काही स्त्रोतांनुसार पंजाब नॅशनल बँक आणि बँक ऑफ बडोदा खाजगी केल्या जातील. याचा अर्थ आहे की आता या बँकांवर मोठमोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांची मालकी स्थापित होऊ शकेल. निश्चितपणे अशी मालकी स्थापन झाल्यावर, **या बँकांकडे असलेला जनतेचा लक्षावधी कोटींचा पैसा टाटा-बिर्ला-अंबानी-अडानी सारख्या धनदांडग्यांना आपल्या कर्जबाजारी झालेल्या उद्योगांना तात्कालिक रूपात वाचवण्यासाठी वापरता येईल.** जनतेचा पैसा बुडवणाऱ्या कंपन्यांना ताब्यात घेणे, त्यांच्या मालकांवर

**संपादक मंडळ**

लिलाव लादणे हे तर दूरच, मोदी सरकार या कर्जबुडव्यांच्याच ताब्यात बँका द्यायला निघाली आहे.

गेल्या वर्षीच 10 बँकाचे विलिनीकरण करून 4 मोठ्या बँका सरकारने बनवल्या. कर्जबुडवेगिरीने मरु लागलेल्या बँकांना एकत्र करून, त्यांचे हिशोब खाते 'चांगले' दाखवले जाईल आणि या बँका पुन्हा अंबानी-माल्या-मोदी सारख्या उद्योगपतींना हजारो कोटींची कर्जे देऊ शकतील यासाठीच हे विलिनीकरण केले गेले.

2018-19 मध्ये सार्वजनिक क्षेत्रातील बँकाचा ऑपरेटींग नफा 1.49 लाख कोटी रुपये होता. याच काळात धनदांडग्या उद्योगपतींनी **बुडवलेल्या कर्जांचा आकडा मात्र 2.16 लाख कोटी रुपये इतका होता.** स्पष्ट आहे की बँकांच्या 'तोट्यात' जाण्याचे मुख्य कारण कॉर्पोरेट कंपन्यांनी बुडवलेली कर्जे आहेत. या उद्योगांना, आणि त्यांच्या मालकांच्या संपत्तीला जप्त करून या कर्जांची अधिकतम वसुली करणे राहिले दूर, उलट मोदी सरकारने तर विजय माल्या, निरव मोदी, सारख्या आपल्या मित्रांना विदेशी पळून जाण्यासाठी व्यवस्थित मदत केली.

यावर अशा भ्रमात राहू नका की बाकी बँका सुरक्षित आहेत. **देशातील एकूण 12 राष्ट्रीयीकृत बँकांपैकी सर्वच बँकांमध्ये सरकारने या अगोदरच कमी-अधिक प्रमाणात खाजगी गुंतवणुकीला मुभा दिलेली आहे.** सर्वात मोठ्या स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये तर सरकारी हिस्सा 57 टक्क्यांवर आला आहे.

मोदी सरकारने '**राष्ट्रीय मालमत्ता पुनर्निमाण कंपनी**' **या नावाने बुडीत खात्यातल्या कर्जांना लपवण्यासाठी योजना आखली आहे. या कंपनीला 'बॅड बँक' असे उगीचच म्हटले जात नाहीये.** ज्या बँकांकडे बुडीत कर्जे आहेत, ती या बँकेकडे वर्ग केली जातील, आणि मग बुडणाऱ्या बँकांचे खाते जरा चांगले दिसू लागेल, हे या कंपनीच्या स्थापनेमागचे उद्दिष्ट. **बुडलेले कर्ज वसूली दूर राहिली, फक्त कागदावरचे आकड्यांचे**

पान 6 वर

# विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्या: नफेखोर शिक्षणव्यवस्थेचे बळी !

✍ **प्रवीण एकडे**

डिसेंबर महिन्यात राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा (नीट) देणाऱ्या तमिळनाडूतील 3 विद्यार्थ्यांनी एकाच दिवशी आत्महत्या केली. **आत्महत्या करण्याचं कारण होतं परीक्षेत पास होणार नाही याची भीती.** या घटनेच्या आधीही तमिळनाडू मधेच 'नीट'ची परीक्षा देणाऱ्या एका विद्यार्थिनीने आत्महत्या केली होती. आत्महत्या करण्यामागचं कारण होत 'नीट'ची परीक्षा इंग्रजीत असते आणि त्या विद्यार्थिनीला **इंग्रजी समजणे अवघड जात होते. त्यामुळे अपयशाच्या भीतीने त्या विद्यार्थिनीने आत्महत्या केली.** कोरोना महामारीमुळे सर्व शाळा, विद्यालये आणि विद्यापीठांमध्ये ऑनलाइन शिक्षण सुरू आहे. काही महिन्याआधी कोल्हापूर जिल्ह्यातील ऐश्वर्या नावाच्या मुलीने ऑनलाइन शिक्षणासाठी लागणारी संसाधने म्हणजेच इंटरनेट, स्मार्टफोन, **लॅपटॉप नसल्यामुळे आत्महत्या केली.** अशी उदाहरणे द्यावीत तेवढी कमी आहेत.

नॅशनल क्राईम रेकॉर्डस ब्युरो ( NCRB ) च्या एका आकड्यानुसार विद्यार्थ्यांच्या आत्महत्येत दरवर्षी वाढ होताना बघायला मिळते आहे. 2016 साली 9,478 विद्यार्थ्यांचा आत्महत्येने मृत्यू झाला होता, 2017 साली 9,905 विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या तर 2018 साली हा आकडा वाढून 10,159 विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. देशात प्रत्येक तासाला 1 विद्यार्थी आत्महत्त्या करतो. यातही महाराष्ट्र राज्य विद्यार्थी आत्महत्येच्या बाबतीत सर्वात पुढे आहे. महाराष्ट्रात दरवर्षी 1,400 विद्यार्थ्यांचा आत्महत्त्या करून मृत्यू होतो. म्हणजेच देशातील प्रत्येक 7 आत्महत्या मागे 1 विद्यार्थी आत्महत्या महाराष्ट्रात होते. **वाढत्या विद्यार्थी आत्महत्येची वरवर दिसायला अनेक कारणे दिसतात, परंतु वास्तवात ही सर्व कारणे या नफेखोर भांडवली शिक्षणव्यवस्थेने निर्माण केलेली कारणे आहेत.**

**विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्यां मागे सर्वात महत्वाचं कारण आहे बेरोजगारी.** सध्या देशात 27 कोटींच्या वर लोक बेरोजगार आहेत. दरवर्षी शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या लाखो विद्यार्थ्यांची या बेरोजगारांच्या फौजेत भर पडते. कोरोना महामारीच्या आधीच नोटबंदी आणि जीएसटी सारख्या धोरणांमुळे अनेक रोजगार नष्ट झाले होते. सी.एम.आय. च्या एका अहवालानुसार नोटबंदी मुळे 50 लाखाच्या वर रोजगार गेले होते. त्यानंतर कोरोना महामारीच्या काळातील नियोजनशून्य लॉकडाऊन मुळे सुद्धा कोट्यवधी रोजगार हिरावले गेले आहेत. यांची सर्वात जास्त झळ असंघटित क्षेत्राला बसली. एका अभ्यासानुसार लॉकडाऊनच्या काळात असंघटित क्षेत्रातील 80 टक्के कामगारांनी आपला रोजगार गमावला आहे. कोरोना महामारीच्या काळात बेरोजगारीने विक्राळ रूप धारण केले आहे. असंघटित क्षेत्रातील कामाची परिस्थिती तर अजूनच वाईट बनली आहे. रोज काम मिळेल याची शाश्वती तर नसतेच (किंबहुना आठवड्यातील 3-4 दिवसच काम मिळते अशी स्थिती आहे) आणि जे काम मिळाले तेही आत्यंतिक कमी मजुरीवर करावे लागते. कोरोना महामारी आधीच्या एका आकड्यानुसार देशात जवळपास 4 कोटी शिक्षित बेरोजगार आहेत. दरवर्षी यू.पी.एस.सी. च्या 800-900 जागा निघतात. **या 800-900 जागांसाठी 10 लाखाच्या वर विद्यार्थी अर्ज करतात.** यू.पी.एस.सी मध्ये सुद्धा लॅटरल एंन्ट्री ने (सरकार परस्पर जागा भरत असल्याने) जागा भरल्या जाणार असल्याने या जागा सुद्धा कमी होणार आहेत.10 लाख विद्यार्थ्यांनी कितीही मेहनत केली तरी नोकरी मात्र

पान 7 वर

# बांधकाम कामगारांच्या नोंदणीचा फार्स

पान 3 वरून

2007 पासून महाराष्ट्र बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे सेसमधून जमा झालेल्या 7,482 **कोटी निधी पैकी केवळ 830 कोटी रुपये खर्च झालेले आहेत.** हजारो कोटी रुपयांचा निधी मंडळाकडे जमा असूनदेखील पुन्हा हातावर पोट असणाऱ्या कामगारांकडून 65 रुपये वसूल करणारे मंडळ हे **कामगार कल्याणासाठी काम करत आहे की कामगारांकडून वसुलीसाठी काम करत आहे** असा प्रश्न उपस्थित होतो.

कामगारांच्या नोंदणीचा अर्ज ऑनलाईन भरल्यानंतर कागदपत्रांच्या पडताळणीसाठी लागणारा वेळ हा सद्य प्रक्रियेत अनिश्चित आहे. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर कागदपत्रांच्या पडताळणीसाठी आणि प्रत्यक्ष कार्ड हातात पडून सरकारी योजनांचे फायदे मिळणे सुरु होण्यासाठी कामगारांना अनेक महिन्यांची प्रतीक्षा करावी लागते. कामगारांच्या आयुष्यात अगोदरच अनेक अनिश्चितता आणि असुरक्षितता असतात. अशा परिस्थितीत नोंदणीच्या प्रक्रियेत असणारी ही अनिश्चितता म्हणजे सरकारचा कामगारांप्रती असणारा निष्काळजीपणा सोडून काही नाही.

**कामगार कार्यालयातील अपुरे मनुष्यबळ हे ह्या दिरंगाईस कारण म्हणून पुढे केले जाते,** परंतु वास्तवात कामगार कार्यालयात नियमित व पुरेशी मनुष्यबळ भरती न करणे हेच मुळात कामगारविरोधी आहे. कामगारांच्या मजुरी बुडवल्याच्या तक्रारी सोडवण्यामध्ये, व कामगारांची इतर कामे करण्यामध्येसुद्धा ह्या अपुऱ्या मनुष्यबळामुळे उशीर होतो व त्याचा भुर्दंड केवळ कामगारांनाच बसतो. नोंदणीकृत कामगारांनी देखील बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या विविध योजनांतर्गत केलेल्या दाव्यांची पूर्तता करण्यास देखील ह्या अपुऱ्या मनुष्यबळामुळे वर्षानुवर्षांचा कालावधी लागतो. उदाहरणादाखल, **अपत्याच्या शिक्षणासाठी मिळणारी मदत ही जर वर्षानुवर्षे रखडली तर त्यामुळे कामगारांच्या अपत्यांना शिक्षण सोडून कामगार म्हणून नाक्यावर यावे लागते.** असे झाल्यानंतर जर मदत कामगारांच्या खात्यात जमा झाली तर त्याने कामगारांचे काय कल्याण होणार?

युनियनला प्रत्यक्ष पाहणीतून असे दिसून आले आहे की लेबर कॅम्पमध्ये राहणाऱ्या बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यासाठी संबंधित नोंदणीकृत ठेकेदार वा बिल्डर कुठलाही पुढाकार घेत नाहीत व पाठपुरावा करत नाहीत. असे सगळे पाहिल्यावर मग प्रश्न पडतो, की ही कामगारांना ठेकेदारांच्या दावणीला बांधणारी, कामगारांकडून वसूली करणारी, कामगारांना स्वतःहून न पार पाडता येणारी **नोंदणी प्रक्रिया आहे तरी कशासाठी? वास्तवात बघितले तर ह्या नोंदणी प्रक्रियेचा उपयोग कामगारांच्या कल्याणासाठी कमी आणि गाजर दाखवण्यासाठी जास्त केला जातो.**

अगोदर बघितल्याप्रमाणे, नोंदणी करण्यासाठी इंटरनेट, चांगल्या प्रतीचा स्मार्टफोन किंवा कंप्यूटर, आणि प्रक्रियेची माहिती असणारा माणूस उपलब्ध असणे आवश्यक आहे. हे सर्व कामगारांकडे उपलब्ध असण्याची शक्यता शून्यच आहे. कामगारांना नेहमीच ठेकेदार वा बिल्डर किंवा इतर संस्था वा संघटनांवर नोंदणीसाठी अवलंबून रहावे लागते. **ह्याचा फायदा सर्वच भांडवली राजकीय पक्ष सर्रास घेतात.** निवडणूक येताच, मग ती नगरपालिकेची असो वा विधानसभेची, सर्वच पक्षांचे कार्यकर्ते, वेगवेगळे पक्ष पडद्याआडून चालवत असलेल्या कामगार संघटना, सक्रीय होतात. कामगारांना नोंदणीचे गाजर दाखवतात. बांधकाम कामगारांसाठी असणाऱ्या विविध योजनांची जंत्री पढतात. कामगारांची कागदपत्रे घेतात. काही कामगारांची वास्तवात नोंदणीदेखील करतात. निवडणुकांचे निकाल लागले की दुसऱ्या दिवशी गायब होतात.

ह्याचे सगळ्यात उत्तम उदाहरण म्हणजे 2019 च्या विधानसभा निवडणूकीच्या वेळी **भाजपने मोठ्या संख्येने बांधकाम कामगारांच्या बोगस नोंदण्या केल्या.** इतक्या मोठ्या संख्येने बोगस नोंदण्या केल्या की सगळा प्रकार फेब्रुवारी 2020 मध्ये उघडकीस आल्यावर काही काळ नव्या बांधकाम कामगारांची नोंदणीच राज्य सरकारने स्थगित केली होती. तेव्हा बांधकाम कामगारांची नोंदणी ही बांधकाम कामगारांची नोंदणी किंवा कल्याण करण्यासाठी नसून, तुटपुंज्या सरकारी योजनांची गाजरं दाखवून बिल्डर-मालकांनी पोसलेल्या भांडवली पक्षांना आणि त्यांच्या नेत्यांना सत्तेत पोचवण्यासाठी आहे.

ही नोंदणी खऱ्या अर्थाने कामगारांच्या हिताची, सोयीची करायची असेल, तर **प्रत्येक मजूर अड्ड्यावर सरकारी लेबर एक्सचेंज (कामगार देवाणघेवाण कार्यालये) स्थापित केले गेले पाहिजेत. ह्या लेबर एक्सचेंजमधून मजूर अड्ड्यावरील प्रत्येक मजुरीची लेखी पावती केली जावी, व मजूर अड्ड्यावरील प्रत्येक कामगाराची नोंदणी लेबर एक्सचेंजद्वारे मजुर अड्ड्यांवर जागीच केली जावी.** परंतु नोंदणी झाली तरीसुद्धा सर्व घरे, रस्ते, रेल्वे, विमानतळ, इमारती बांधणाऱ्या बांधकाम कामगारांना दोन-पाच हजारांची भीक घेऊन संतुष्ट होऊन चालणार नाही. बांधकाम कामगारांच्या दुरावस्थेचे सगळ्यात मोठे कारण म्हणजे रोजगारातील अनिश्चितता. ह्या अनिश्चिततेच्या विरोधात, ठेकेदारी प्रथेच्या विरोधात, रोजगाराच्या मूलभूत अधिकारासाठी एकजुट होऊन झुंजार लढा उभा करावा लागेल.

---

साथींनो

'कामगार बिगुल' आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लूट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.


• रूम नंबर 209, हिरानंदानी बिल्डिंग-7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043 मो. - 9619039793, 9082861727

• अहमदनगर - 9156323976, 9657590491

• पुणे - 9422308125


---

## 'कामगार बिगुल'चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

1. **'कामगार बिगुल' व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांतींचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.**

2. **'कामगार बिगुल' भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.**

3. **'कामगार बिगुल' स्वतः अश्या चर्चा चालवेल जेणे करून कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य लाइनची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य लाइनच्या सत्यापनाचा आधार तयार होऊ शकेल.**

4. **'कामगार बिगुल' कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षांसोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्याच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. 'कामगार बिगुल' सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतीकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.**

5. **'कामगार बिगुल' हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्याची भूमिका सुद्धा पार पाडेल.**

---

**बिगुल व्हॉट्सअॅप चॅनेल**

**जर तुम्ही आमच्याशी व्हाट्सअॅप वर जोडून घेऊ इच्छिता, तर या लिंक वर जाऊन आमचा व्हॉट्सअॅप चॅनेल जॉईन करावा - http://www.marathi.mazdoorbigul.net/whatsapp**

**चॅनेल जॉईन करण्यामध्ये काही समस्या असेल तर या नंबर वर आपले नाव आणि जिल्हा लिहून पाठवावा - 9892808704 (पर्यायी नंबर 9619039793)**

---



**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वत: कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**

**लेनिन**

---


# कामगार बिगुल

खाजगी वितरणासाठी

| | | |
|---|---|---|
| संपादक मंडळ | : | निखील एकडे, बबन ठोके |
| संपादकीय कार्यालय | : | रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग - 7-बी, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट), मुंबई 400043 |
| संपर्क | : | 8669735643 , 9619039793 |
| ईमेल | : | bigulakhbar@gmail.com |
| सहयोग राशी | : | रु. 5 (एका अंकासाठी) |
| वार्षिक | : | रु. 100 (टपाल शुल्कासह) |

# बांधकाम कामगारांच्या नोंदणीचा फार्स

## भांडवली नोकरशाहीचे “कल्याणकारी” ढोंग! कामगारांसाठी सरकारी योजना: फक्त दिखावा!

**✍निमिष**

आज शेतीनंतर सर्वाधिक कामगार बांधकाम क्षेत्रात कार्यरत आहेत. देशभरात इमारत आणि इतर बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांची संख्या दोन कोटींपेक्षा जास्त आहे. इतक्या मोठ्या संख्येने कामगार ह्या क्षेत्रात कार्यरत असून सुद्धा बांधकाम क्षेत्रातील कामगार सर्वाधिक अनौपचारिक, असंघटित आणि विखुरलेले आहेत.

बांधकाम कामगारांशी सरकारने, मग ते केंद्रातील असो किंवा राज्यातील, नेहमीच टोकाच्या अनास्थेचा व्यवहार केला आहे. 1996 साली, केंद्रातील तत्कालीन नरसिंह राव, आणि तदनंतर वाजपेयी सरकारने इमारत व इतर बांधकाम कामगार कायदा (1996) बनवला. ह्या कायद्यानुसार सर्व राज्यांत इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ बनवले गेले. बांधकाम कामगारांना व त्यांच्या मुलांना व कुटुंबांना शिक्षण, आरोग्य, व सन्मानाचे जीवन जगण्यासाठी लागणाऱ्या सर्व सुविधा पुरवणे हे ह्या मंडळांचे घोषित उद्देश्य आहे. ह्यासाठी प्रत्येक राज्यातील बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने अनेक योजना घोषित केल्या आहेत. ह्या योजनांसाठीचा निधी उभा करण्यासाठी प्रत्येक बिल्डरकडून बांधकाम कामगार कल्याण उपकर घेतला जातो. **हा कायदा, ह्या कायद्याच्या आधारे बनलेली कामगार कल्याण मंडळे, आणि त्यांच्या योजना हे सगळेच्या सगळे एक महाकाय, पोकळ ढोंग आहे.**

ह्या मंडळांनी केवळ कागदावर मोठ्या मोठ्या योजना घोषित केल्या आहेत. कुठल्याच योजना लागू करण्यामध्ये मात्र ही मंडळे सर्वथा कुचकामी ठरली आहेत. बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी वसूल केलेल्या निधीपैकी 10 टक्के रक्कम सुद्धा कामगारांच्या वास्तव कल्याणासाठी वापरली गेलेली नाही. **2015 मध्ये सुप्रीम कोर्टाला सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात केंद्र सरकारने म्हटले होते की कुठल्याही राज्याच्या बांधकाम कामगार कल्याण मंडळाच्या सल्लागार समितीची एकही बैठक 2014-15 ह्या वर्षभरात झालेली नाही.** कामगारांप्रती इतकी टोकाची अनास्था, एवढा बेजबाबदारपणा, ही सर्व परिस्थिती “शेक्सपीयरलासुद्धा लाजवेल अशी” शोकांतिका आहे असे सुप्रिम कोर्टाने एका निकालात म्हटले होते.

लॉकडाऊनमध्ये हजारो किलोमीटर चालत घरी जात असणाऱ्या कोट्यवधी कामगारांना सरकारकडून आर्थिक मदत दिली जावी ह्यासाठीच्या याचिकेवर “कामगारांना खायला मिळत असेल तर त्यांना पैशाची गरजच काय?” असा निर्लज्ज, संवेदनाहीन सवाल करणाऱ्या ह्या मालक-बिल्डरांच्या कोर्टालादेखील बांधकाम कामगार कल्याण मंडळांची अवस्था ही शोकांतिका वाटते ह्यावरून स्थिती किती भयंकर आहे ते दिसून येते.

महाराष्ट्र बांधकाम कामगार कल्याण मंडळाची आजची स्थिती अधिकच भीषण आहे. ‘हॅबिटॅट फॉर ह्युमॅनिटी’ ह्या संस्थेने लॉकडाऊनच्या काळात केलेल्या सर्व्हेनुसार, **सर्व्हेतील बांधकाम कामगारांपैकी 96 टक्के कामगारांची ह्या मंडळाकडे नोंदणीच झालेली**



**नाही. 62 टक्के कामगारांना तर हे असे मंडळ अस्तित्वात आहे हेच माहिती नाही. एका वृत्तानुसार 2007 पासून मंडळाकडे जमा झालेल्या 7,428 कोटींपैकी केवळ 830 कोटी रुपयेच खर्च झाले आहेत.** ज्या थोड्याफार नोंदणीकृत कामगारांना लॉकडाऊनमध्ये मदत मिळाली, त्यांनासुद्धा सहा महिन्यांहून अधिक चाललेल्या लॉकडाऊनमध्ये केवळ पाच हजार रुपयांची तुटपुंजी मदत, नव्हे भीक, मिळाली आहे. कोरोनाग्रस्त असताना कामगार मंत्री दिलीप वळसे पाटलांचं शेंबडं नाक पुसायला लागणाऱ्या टिशू पेपरचा खर्चदेखील ह्यापेक्षा जास्त झाला असेल!

दुसरीकडे कामगारांची परिस्थिती दिवसेंदिवस आणखी बिकट होत आहे. आज लॉकडाऊन उघडले असले तरी आठवड्यातून दोन दिवसाच्या वर काम मिळत नाहीच. मजुरी पडलेली आहे. त्यातच डोक्यावर दुसऱ्या लॉकडाऊनची टांगती तलवार आहेच. पहिल्या लॉकडाऊनच्या काळात घेतलेले उधार आणि कर्ज अजूनही फेडले गेलेले नाहीत. लाईटबिल, घराचं भाडं, कर्जांचे हफ्ते, सगळेच अजूनही थकलेले आहेत. शिक्षण ऑनलाईन सुरू झाल्यामुळे कामगारांच्या मुलांची शाळा मागे पडलेली आहे, सुटलेली आहे. रोज वाढणारी महागाई ह्या सगळ्या वणव्यात तेल ओतत आहेच. मागच्या काही महिन्यांमध्ये अनेक बांधकाम कामगारांना अकाली मृत्यूला सामोरे जावे लागले आहे —काहींना कोरोनामुळे, काहींना उपासमारीमुळे, काहींना घरी जाताना चालता चालता मृत्यू आला आहे. अनेक बांधकाम कामगारांनी ह्या सगळ्या परिस्थितीने पिचून आत्महत्या देखील केलेली आहे. रोजगार आणि शिक्षण दोन्हीवर गदा आल्याने अनेक बांधकाम कामगार व्यसनांच्या, गुन्हेगारीच्या आहारी गेलेले आहेत.

ह्या पार्श्वभूमीवर बांधकाम कामगारांच्या एकजुटीचे महत्त्व आणि गरज ओळखून पुण्यातील काही कामगार व कामगार चळवळीतील कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र बांधकाम कामगार युनियनची सुरुवात केली. महाराष्ट्र बांधकाम कामगार युनियनने सर्व सदस्य बांधकाम कामगारांची महाराष्ट्र बांधकाम कामगार कल्याण मंडळाकडे नोंदणी करण्याचे काम हाती घेतले. **कामगारांच्या नोंदणीची प्रक्रिया ही वास्तवात अत्यंत कामगारविरोधी आहे हेच युनियनला ह्या प्रक्रियेतून जाताना दिसून आले.**

### कामगार नोंदणीची यातनादायी प्रक्रिया

बांधकाम कामगारांना महाराष्ट्र बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदणी करण्यासाठी मागील **वर्षात 90 दिवस किंवा अधिक काम केल्याचे प्रमाणपत्र** घ्यावे लागते. हे प्रमाणपत्र ठेकेदाराने देणे अपेक्षित आहे. परंतु मजूर नाक्यावर येणाऱ्या कामगारांसाठी ठेकेदार नियमितपणे बदलत असल्याने त्यांना कुठल्याही एकाच ठेकेदाराकडे 90 दिवस काम करणे अशक्य होते.

त्यामुळे,नाक्यावरील कामगारांची नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागाने दोन वर्षांपूर्वी एका शासन निर्णयाद्वारे कामगारांना 90 दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र देण्याचे अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले आहेत. पण **स्थानिक स्वराज संस्थांकडून दिल्या जाणाऱ्या प्रमाणपत्राचे स्वरूप अत्यंत कामगारविरोधी आहे.** प्रथमतः त्या प्रमाणपत्रात नियोक्ता किंवा ठेकेदाराकडून त्यांचे नाव, पत्ता, संपर्क, नोंदणी क्रमांक, आणि सही घेणे आवश्यक आहे. परंतु ह्यामुळे **कामगार ठेकेदाराच्या दावणीला बांधला जातो, जेव्हा की ठेकेदार आणि कामगारांची हिते परस्परविरोधी असतात.** अशा परिस्थितीत कामगारांना ठेकेदाराच्या दावणीला बांधून सदर मंडळ हे कामगारांच्या कल्याणासाठी काम करत नसून, कामगारांना पगारी गुलाम ठेवण्याकरिताच काम करते हे स्पष्ट होते. वास्तव हे आहे की **बहुसंख्य ठेकेदार अशा प्रकारचे प्रमाणपत्र देण्यास सरळ नकार देतात!**

दुसरे म्हणजे नाक्यावर येणारे **बहुतांश ठेकेदार नोंदणीकृत नसतात.** बांधकाम करण्यासाठी व्यावसायिक ठेकेदार नसलेले अनेक लहान ठेकेदार देखील नाक्यावरून कामगारांना कामासाठी नेतात. अशा परिस्थितीत ठेकेदाराचा वा बिल्डराचा नोंदणी क्रमांक अस्तित्वातच नसतो. त्यामुळे नाक्यावरील बांधकाम कामगारांच्या नोंदणीच्या प्रक्रियेत हा देखील आणखी एक अडथळा बनतो. मॉल, टाऊनशिप इत्यादी मोठ्या प्रकल्पांमध्ये असणारे ठेकेदार वा विकासक नोंदणीकृत असतात, परंतु नाक्यावर येणारे ठेकेदार अपवादानेच नोंदणीकृत असतात. अशा **ठेकेदारांची नोंदणी करण्यात सरकारला कोणताही रस नाही!**

तिसरे म्हणजे नाक्यावरील बांधकाम कामगार कुठल्याही एका ठिकाणी नियमित स्वरूपात काम करीत नाहीत. त्यामुळे नाक्यावरील बांधकाम कामगारांचे ठेकेदार दररोज बदलत असतात. अशा परिस्थितीत 90 दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी कामगारांवर **90 वेगवेगळ्या ठेकेदारांचे तपशील आणि सह्या मिळवण्याची पाळी येऊ शकते.** त्यामुळे नाक्यावरील कामगार मोठ्या संख्येने केवळ ह्या फॉर्मच्या स्वरुपामुळेच नोंदणी प्रक्रियेतून बहिष्कृत होतात.

यानंतरची अडचण म्हणजे, बांधकाम कामगारांना स्थानिक स्वराज्य संस्थांकडून 90 दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी आज प्रमाणपत्रासाठीच्या अर्जाबरोबर **आधार कार्ड व मतदार ओळखपत्र जोडावे लागते.** परंतु परगावातून व परराज्यातून येणाऱ्या अनेक प्रवासी कामगारांकडे मतदार ओळखपत्र नसते. प्रवासी बांधकाम कामगारांना सरकारच्या विविध योजनांची मोठी गरज असते. मतदार ओळखपत्र नसल्यामुळे अनेक कामगारांना नोंदणी करता येत नाही व त्यांना ह्या योजनांपासून वंचित राहावे लागते.

### कामगाराचा जीव घेणारी ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया

सदर प्रमाणपत्र मिळाल्यानंतर देखील प्रत्यक्ष नोंदणी करण्याची प्रक्रिया सुद्धा प्रचंड कामगारविरोधी आहे. नोंदणीची प्रक्रिया ऑनलाईन केलेली आहे. जवळजवळ सर्वच कामगारांना इंटरनेट उपलब्ध नाही, आणि उपलब्ध असेल तरीही वापरता येत नाही ही वस्तुस्थिती कामगार कल्याण मंडळाला आणि सरकारला माहित नाही इतके काही ते दूधखुळे नाहीत. तरीही ती प्रक्रिया ऑनलाईन आहे. इतकेच नव्हे, तर फॉर्म भरल्यानंतर त्या फॉर्मबरोबरच कामगारांना **आधार कार्ड, पासबुक, सारखी कागदपत्रे स्कॅन करून जोडावी लागतात.** ज्या कामगाराची नोंदणी करायची आहे त्या **कामगाराचा फोटो काढून जोडावा लागतो.** म्हणजेच आज जर एखाद्या कामगाराला नोंदणी करायची असेल तर **केवळ इंटरनेट उपलब्ध असून भागत नाही, तर किमान चांगला कॅमेरा असणारा स्मार्टफोन असावा लागतो.** त्यासोबतच तो फोन वापरून कागदपत्रे स्कॅन कशी करायची, फॉर्मला कशी जोडायची **ह्याचे ज्ञान असावे लागते. हे सर्व उपलब्ध असणारे फक्त शंभर बांधकाम कामगार जरी आपले ‘आदर्श’ कामगार मंत्री दिलीप वळसे पाटील ह्यांनी किमान त्यांच्या आंबेगावात तरी शोधून दाखवावे.** म्हणजेच कामगारांची नोंदणी दुसऱ्या कुणीतरी जाणत्याने करून दिल्याशिवाय शक्य नाही हे स्पष्ट आहे. ह्या मुद्द्याकडे नंतर पुन्हा येऊ.

कामगारांच्या नोंदणीचा ऑनलाईन अर्ज भरून पोचपावती क्रमांक मिळाल्यानंतर देखील कामगारांना कागदपत्रांच्या पडताळणीसाठी कामगार कार्यालयामध्ये उपस्थित राहावे लागते. त्यामुळे रोजंदारीवर काम करणाऱ्या, हातावर पोट असणाऱ्या कामगारांना एक दिवस कामातून सुट्टी घ्यावी लागते. **कामगारांना संपूर्ण नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी किमान 3 दिवस सुट्टी घ्यावी लागते**—90 दिवसांचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी एक दिवस, ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी एक दिवस, व कामगार कार्यालयामध्ये उपस्थित राहण्यासाठी एक दिवस. यातल्या एकाही प्रक्रियेत काही खोळंबा आला की दिवस वाढलेच समजा! **कामगारांची नोंदणी करणे ही सर्वथा सरकारची जबाबदारी आहे, व त्यासाठी कामगारांना होत असलेले नुकसान हे सरकारचे कामगारविरोधी धोरण उघडे पाडते.**

सर्व कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर देखील नोंदणी पूर्ण होऊन कार्ड हातात पाडण्यासाठी कामगारांना **65 रुपये स्वतःच्या खिशातून घालावे लागतात.** कामगारांचे कल्याण करण्याचे उद्देश्य असणारे बोर्ड कामगारांकडूनच इतकी कद्रूपणे वसुली करून काय साध्य करू पाहत आहे? एका रिपोर्टनुसार

**पान 2 वर**

# 1946 सालचे नाविकांचे बंड

## 75 वर्षे विस्मृतीच्या अंधारात ढकलला गेलेले झुंजार जनलढा

✍ **निखील**

इंग्रजी जुलमामुळे 1946 ला नाविकांच्या बंडाच्या समर्थनार्थ संपात सामील झालेल्या कामगारांच्या रक्ताने मुंबईचे रस्ते लाल झाले तेव्हा **साहिर लुधियानवी यांनी जळजळीत सवाल केला: 'ये किसका लहू ये कौन मरा...?'**




उठाव करणारे सैनिक

ज्या बंडामुळे एकाच वेळेला साम्राज्यवादी इंग्रजी सत्तेच्या पायाखालची जमीन हादरली, साम्राज्यवाद्यांच्या विरोधातील भारतीय सैन्याच्या **ज्या बंडाला भांडवलदार-जमिनदारांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या काँग्रेस आणि मुस्लिम लीगच्या 'दिग्गज' नेत्यांनी नाकारले, त्या नाविकांच्या बंडाला मागील महिन्यात 18-23 फेब्रुवारी ला 75 वर्ष पूर्ण झाली.** वसाहती गुलामी विरोधातील संघर्षात अनन्य महत्व असणाऱ्या या बंडाबद्दल आजही फार कमी बोलले जाते कारण **जनतेच्या क्रांतिकारी पुढाकाराची भिती शोषणकारी सत्ताधारी वर्गाला नेहमीच वाटत असते.**

1939 ला दुसऱ्या महायुद्धाची सुरवात झाली. महायुद्धामुळे इंग्रजांना वसाहतींमधून सैन्य भरती वाढवावी लागली. देशात व आंतरराष्ट्रीय युद्ध आघाड्यांवर काम केलेल्या ह्या सैन्यावर देशातील व आंतरराष्ट्रीय उलथापालथीचा परिणाम न होणे अशक्य होते. साम्राज्यवादी वसाहतिक गुलामी, असमानता व वंशवादी भेदभाव सैन्यामध्येही होता. याचाच परिणाम होता की 1943 ते 1945 दरम्यान नौसेने मध्ये 9 वेळा विविध प्रकारच्या असंतोषाला तोंड फुटल्याच्या घटना घडल्या होत्या. **18 फेब्रुवारी 1946ला बंडाची ठिणगी पेटायला कारण झाले भारतीय सैनिकांना देण्यात येणारे निकृष्ट भोजन व भेदभाव.** 'तलवार' या बोटीवरील नाविकांकडून ह्याचा विरोध उपोषणाने सुरू झाला. बघता बघता 19 फेब्रुवारी ला 'कॅसल' आणि 'फोर्ट बराक' व मुंबईच्या 22 समुद्री जहाजांवर भडका झाला. साम्राज्यवाद विरोधी, राष्ट्रवादाच्या भावनेने प्रेरित नौसैनिकांनी युद्ध नौकांवरील इंग्रजी रॉयल जॅक उतरवून जहाजांवर तत्कालीन प्रमुख राजकीय शक्ती असलेल्या काँग्रेस, मुस्लिम लीग चा झेंडा व लाल बावटा एकत्र फडकवला. नाविकांनी आंदोलनाला संघटित रूप देण्यासाठी लागलीच निवडणुकी द्वारे **नौसेना केंद्रीय संप समितीची स्थापना केली ज्याचे नेतृत्व एम एस खान ह्यांच्या कडे देण्यात आले.** नौसेनिकांच्या मागणीपत्रात चांगले अन्न, इंग्रज व भारतीय नाविकांना समान वागणूक व समान वेतन सोबतच इंडोनेशियन जनतेच्या वसाहतीक दमनासाठी पाठवलेल्या भारतीय सैन्याची माघार, आझाद हिंद सेनेच्या सैनिकांची सुटका, सर्व राजकीय कैद्यांची सुटका, सर्व ब्रिटीशांनी भारत सोडणे, भारतीय अधिकाऱ्यांच्या नेमणूका सारख्या राजकीय मागण्या सुद्धा सामील करण्यात आल्या.

नौसेनिकांनी आंदोलनाचे नेतृत्व करण्यासाठी राष्ट्रीय राजकारणातील काँग्रेस व मुस्लिम लीगच्या बड्या नेत्यांना आमंत्रित केले. **परंतु आपल्या वर्गसहयोगाच्या नितीमुळे बंडाचे नेतृत्व व समर्थन तर सोडाच, या दोन्ही पक्षांनी आंदोलकांवर माघार घेण्यासाठी दबाव बनवला.** भांडवली राष्ट्रीय नेतृत्वाकडून इंग्रजांच्या बदल्याच्या कारवाई पासून संरक्षणाच्या अटीवर आंदोलन मागे घेण्याचे सांगण्यात आले. या आंदोलनाला फक्त कम्युनिस्ट पक्ष आणि समाजवादी नेत्या अरुणा असफ आली यांनी पाठिंबा दिला. याचा परिणाम झाला की **सैनिकांनी काँग्रेस आणि मुस्लिम लीग चे झेंडे उतरवले आणि फक्त लाल झेंडे फडकावत ठेवले.**

शांतीपूर्ण संप की पूर्ण विद्रोह ह्या दोलायमान स्थितीत 20 जानेवारीला नौसेनिकांनी संप मागे घेतला व आपापल्या जहाजांवर परत जाण्याच्या आदेशाचे पालन केले. परंतु दिलेले आश्वासन शब्द न पाळता परत आलेल्या नाविकांना सैन्याने घेरले. 21 फेब्रुवारी ला कॅसल बराकीतील नाविकांनी घेरा तोडण्याचा प्रयत्न करताच युद्धाला तोंड फुटले. ब्रिटीश डमिरल गॉडफ्रे यांनी तर नौसेनेला हवाई हल्ल्याने नष्ट करण्याची धमकी दिली. अशा स्थितीत नौसेनिकांसोबत एकता प्रदर्शित करण्यासाठी गेट वे ऑफ इंडिया वर मोठ्या प्रमाणात सामान्य जनता एकत्र यायला सुरू झाली ज्यात मुख्यतः गोदी कामगार, सामान्य नागरिक आणि दुकानदार सामील होते. 22 फेब्रुवारी पर्यंत संप देशभरातील अनेक नौसेना केंद्रांपर्यंत आणि समुद्री जहाजांपर्यंत पोहोचला होता. **आंदोलनाची व्याप्ती त्याकाळचे बॉम्बे, मद्रास, कलकत्ता, कोचीन, विशाखापट्टनम, अंदमान व आंदोलनाचे एक महत्वपूर्ण केंद्र असणाऱ्या कराची पर्यंत पसरली.** कराची जवळील मनोरा बेटही सैनिकांनी ताब्यात घेतले होते. आंदोलनाच्या शिगेच्या क्षणी संपात **78 जहाजे आणि 20 किनाऱ्यांवरील नाविक** प्रतिष्ठान सामील होते. सुमारे 20,000 नाविकांनी ह्यात भागीदारी केली. हिंदू-मुस्लिम कष्टकरी-कामगारांनी, विद्यार्थी व नागरिकांनी संपाच्या समर्थनार्थ पोलिस व सेनेसोबत सोबत संघर्ष केला. **22 फेब्रुवारी ला जवळपास 3,00,000 कामगारांनी राजकीय संप केला.** रस्त्यांवर सैन्यासोबत संघर्ष घेतला व ह्यात सरकारी अनुमाना नुसार 228 लोक मृत्यूमुखी पडले आणि जवळपास 1,046 जखमी झाले. अशा स्थितीत या बंडाचा शेवट 23 फेब्रुवारी ला आंदोलन माघारी घेण्यासोबत झाला.




मुंबईमध्ये जनतेचा प्रतिकार

लढवैय्या सैनिकांच्या आणि त्यांच्या समर्थनात उभ्या झालेल्या कामगार-कष्टकरी जनतेच्या या लढ्याला विरोध करण्याचेच काम भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील 'नेतृत्व' स्थानी असलेल्या काँगेस व मुस्लिम लीग सारख्या पक्षांनी केले. देशी भांडवलदार वर्गाच्या, जमिनदार वर्गाच्या



एका नौसेनिकाला अटक करताना

सेवेत लागलेल्या या पक्षांनी नेहमीच जनतेच्या स्वतंत्र पुढाकाराच्या आंदोलनांना विरोध केला. स्वातंत्र्य चळवळीत हिंदू महासभा, रा. स्व. संघ व मुस्लीम लीग सारख्या धार्मिक कट्टरपंथियांनी तर सरळ इंग्रजांच्या तोडा-फोडा नीतीला राबवण्यात मदत करून वसाहतवाद्यांची सेवाच केली; पण वर उल्लेखल्याप्रमाणे काँग्रेस व गांधीवाद्यांचाही भारताला ब्रिटिशांपासून राजकीय स्वातंत्र्य मिळवून देण्यातच नव्हे तर भारतीय क्रांतीला शांत करण्यातही मोठा वाटा राहिला आहे. 'मजदूर बिगुल' मधील एका लेखानुसार नाविकांच्या बंडाबाबतीत राष्ट्रीय नेतृत्वाच्या मुलाखतीतून हे एकदम स्पष्ट होईल. जसे की **वल्लभभाई पटेलांनी 1 मार्च 1946 ला एका कांग्रेसी नेत्याला लिहिले, 'सैन्यातील शिस्तीला सोडणे शक्य नाही... स्वतंत्र भारतात आपल्याला सैन्याची आवश्यकता असणार आहे.' गांधींनी सुद्धा ही 'वाईट' व 'अशोभनीय' उदाहरणे स्थापित करण्यासाठी नाविकांची निंदा केली व त्यांना सल्ला दिला की 'ज्यांना अडचणी आहेत ते गुपचूप नोकरी सोडू शकतात'.** व सोबतच गांधी हे सुद्धा म्हटले की 'हिंसात्मक कार्यवाही साठी हिंदू व मुस्लिमांचे एक होणे अपवित्र गोष्ट आहे'. एवढेच काय ह्या बंडाच्या इतिहासाचा काँग्रेसने एवढा धसका घेतलेला होता की **1965 ला उत्पल दत्त ह्यांना नाविकांच्या बंडावर लिहिलेल्या 'कल्लोळ' नाटकासाठी प्रतिबंधक स्थानबद्धता कायद्या अंतर्गत काँग्रेस सरकारने 8 महिन्याचा तुरुंगवास भोगायला लावला. भारत आणि पाकिस्तानच्या सत्ताधाऱ्यांचे खरे चरित्र यातूनही दिसून येते की या बंडात सामील झाल्याबद्दल बडतर्फ केलेल्या जवळपास 476 नौसैनिकांना दोन्ही देशांमध्ये पुन्हा नौसेने मध्ये भरती केले गेले नाही.**

ह्या लढ्याच्या 75 वर्षांनंतरही भांडवली मीडियाकडून आपण या लढ्याला जनतेपर्यंत पोहोचवण्याची अपेक्षा करू शकत नाही. अशा जनसंघर्षावर चढवली गेलेली धुळराख कामगार-कष्टकऱ्यांनाच पुसावी लागेल. स्वातंत्र्य चळवळीतही वर्गीय एकजूटता व वास्तविक संघर्ष इंग्रजांसोबतच भांडवली राष्ट्रीय नेतृत्वातही भीती उत्पन्न करत होता. 1946 च्या नाविकांच्या बंडासारख्या लढायांच्या अपयशाने व क्रांतिकारी शक्तींच्या कमजोरी मुळे भारताला 1947 मध्ये फक्त सत्ता हस्तांतरणा कडे जावे लागले. स्वातंत्र्य लढ्यात भांडवली नेते व त्यांचा प्रमुख पक्ष काँग्रेस ने ब्रिटिशांसोबत कुठलाही क्रांतिकारी संघर्ष न करता तडजोड-दबाव-तडजोड नीती वापरली, कारण क्रांतिकारी संघर्षातून जो जनतेचा क्रांतिकारी पुढाकार बनतो, त्याची शोषक वर्गाचे प्रतिनिधी असलेल्या अशा पक्षांना नेहमीच भिती होती. अशा तडजोडीतून जे 'स्वातंत्र्य' मिळाले त्यात जनतेला तमाम भांडवली विकृतींसोबत सरंजामी रूढीवादी मूल्य-मान्यता, गुलामीची मानसिकता, अपूर्ण भूमीसुधार सुद्धा मिळाले.

परंतु स्वातंत्र लढ्यात गदर पार्टी, एच.एस. आर.ए. पासून ते पुनप्रा, वायलार, तेभागा, तेलंगणा व नाविक बंडा सारखे अनेक प्रेरणादायी लढे सामान्य जनतेने अत्यंत निकराने लढले ज्यांपासून आजही कष्टकरी कामगार जनतेनी प्रेरणा घेण्याची गरज आहे त्यावर जमा झालेली विस्मृतीची धूळ राख झाडण्याची गरज आहे.

# इंटरनेटवर तुमची माहिती विकून मोठमोठ्या कंपन्या कमावताहेत हजारो कोटी !

## व्हॉट्सअॅप च्या नवीन धोरणाच्या निमित्ताने, इंटरनेटवर निजतेचे (प्रायव्हसी) संकट ओळखा!

✍ रवी

स्मार्टफोन आणि 4-जी आल्यापासून कोट्यवधी नागरिकांच्या जीवनात, ज्यात कामगार कष्टकरीही सामील आहेत, इंटरनेटची उपलब्धता आली आहे. तुमच्या इंटरनेटच्या आणि प्रत्येक  प च्या वापरातून पैदा होत आहे तुमच्याबद्दलची माहिती (डेटा, ज्याकरिता 'विदा' हा शब्द आता प्रचलित होत आहे), ज्या माहितीला आज हजारो कोटी रुपयांचे मोल आलेले आहे. तुमच्या सहमतीसह किंवा सहमतीशिवाय, तुमच्याबद्दलच्या अशा माहितीच्या खरेदी विक्रीतून मोठमोठ्या कंपन्या हजारो/लाखो कोटी रुपये कमावत आहेत. तुम्हाला इंटरनेट वर जी गोष्ट 'फ्री' म्हणजे मोफत मिळते असे वाटते, तिची किंमत खरेतर तुमच्या खाजगी माहितीच्या विक्रीतून, तुमच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी वसूल केली जात आहे. समजून घ्या - इंटरनेट, मोबाईल  प्स चे हे गौडबंगाल.

खरेतर इंटरनेटमुळे आज आपण ज्ञानाच्या एका अशा शिखरावर पोहोचलो आहोत जेथून हातातल्या एका यंत्राने संपूर्ण विश्वाचे दर्शनसुद्धा होऊ शकते. ऐतिहासिकरित्या भौतिक परिस्थितीच्या मर्यादेत जे काही शक्य होते ते शोधून काढून माणसाने आपले भौतिक जग संपन्न केले. या सर्व विकासात मोठा वाटा होता दळणवळणाच्या, संपर्काच्या साधनांचा. जशी माहितीची देवाण-घेवाण अधिक सोयीस्कर आणि जलद गतीने शक्य होत गेली, तशी नवनवीन शोध लावण्याची गतीसुद्धा वाढत गेली. विज्ञान आणि तंत्रज्ञानात सातत्याने होत असलेल्या प्रगतीमुळे एके काळी अशक्य वाटणाऱ्या गोष्टीसुद्धा साकारल्या जातात. याचेच उच्चतम शिखर आहे **इंटरनेट**, ज्यामध्ये जगातील अब्जावधी, होय **अब्जावधी, कंप्युटर, स्मार्टफोन आणि इतर असंख्य उपकरणे एकमेकांना जोडलेली आहेत** आणि प्रकाशाच्या वेगाने माहितीची आदानप्रदान जगाच्या कोणत्याही कोपऱ्यातून करणे शक्य आहे.

गेल्या काही वर्षात वाय-फाय तसेच सेल्युलर 4-जी तंत्रज्ञानामुळे इंटरनेट जवळपास सर्वत्र व सदैव उपलब्ध होऊ लागले. त्याच्या जोडीला केवळ तळहातावर मावतील इतक्या आकाराचे, पण उच्च कार्यक्षमता असणारे असे (विशेषत: अँड्रॉइड) स्मार्टफोन्स बाजारात आले. ट्राय (TRAI) च्या ऑक्टोबर 2020 च्या अहवालानुसार भारतात 75 कोटींपेक्षा जास्त इंटरनेट वापरकर्ते आहे. यामुळे चीन नंतर भारत दुसरे सर्वात मोठे डिजिटल मार्केट बनले आहे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रांमध्ये इंटरनेटचा वापर वाढल्यामुळे आणि काही क्षेत्रांमध्ये वापर करणे अटळ असल्यामुळे निर्माण होणाऱ्या माहितीला काही सीमाच उरल्या नाहीत. **आपण वापर करत असलेली प्रत्येक  प, भेट देत असलेली प्रत्येक वेबसाईट, क्लिक केलेली प्रत्येक लिंक अशा प्रत्येक कृतीतून आपल्याबद्दल एक खाजगी माहिती तयार होत असते आणि ती माहिती इंटरनेट सुविधा देणाऱ्या मोबाईल कंपन्या,  प चालवणाऱ्या कंपन्या, वेबसाईट्स चालवणाऱ्या कंपन्या, तसेच देशी-विदेशी सरकारांना उपलब्ध होत असते.** या माहितीच्या प्रचंड उत्पत्तीमुळेच, मागील काही काळात माहितीचा गैरवापर, डेटा सुरक्षा व गोपनीयतेची तडजोड किंवा नागरिकांच्या निजतेच्या उल्लंघनासंदर्भात अनेक बातम्या आपल्याला बघायला मिळतात.

नोव्हेंबर, 2016 मध्ये स्मार्टफोनवर इंटरनेटचा वापर करणाऱ्यांची संख्या प्रथमच संगणकावर इंटरनेट वापरणाऱ्यांपेक्षा जास्त झाली. त्यानंतर आजपर्यंत प्रत्येक दिवशी ही दरी वाढतच गेली आहे आणि भविष्यात ती अशीच वाढत जाईल याबद्दल शंका नाही. त्यामुळेच स्मार्टफोनवर डेटाची निर्मिती संगणकापेक्षा जास्त आहे. जगभरातील 4.4 अब्ज इंटरनेट वापरकर्त्यांचा जवळपास 250 कोटी जीबी डेटा रोज बनतो! हा आकडा समजायला अवघड आहे, कारण तो कल्पनेपलीकडे अतिप्रचंड आहे. फेसबुक सारख्या कंपनीचे उदाहरण घ्यायचे झाले तर आजघडीला फेसबुकचे जवळपास 250 कोटी सक्रिय वापरकर्ते आहेत. म्हणजे जगाच्या एकूण लोकसंख्येच्या चक्क एकतृतीयांश एवढे लोक फेसबुकचा दैनंदिन वापर करतात. एवढ्या प्रचंड जनसमुदायाकडून प्रचंड डेटा निर्माण होतो. एका अंदाजानुसार, **फेसबुकवर केवळ एका दिवसात तब्बल चार पेटाबाइट्स (40 लक्ष जीबी) इतक्या डेटाचे उत्पादन होते.** फेसबुकसारख्या इतर अनेक समाजमाध्यमांद्वारे प्रचंड डेटा दररोज निर्माण होतो.

परंतु या डेटा ला बाजारामध्ये किंमत मात्र प्रचंड मिळत आहे. याचा अंदाज बांधण्यासाठी या "डेटा" कंपन्यांच्या शेअरबाजारातील किमती आपण बघू शकतो. 2013 मध्ये जेव्हा ट्विटरचा आय.पी.ओ. काढला गेला तेव्हा त्याला बाजारात 1,400 कोटी अमेरिकी डॉलर्स (जवळपास 98,000 कोटी रुपये) एवढी किंमत मिळाली आणि त्याच काळात फेसबुकला 1,600 कोटी अमेरिकी डॉलर्स (जवळपास 1.12 लाख कोटी रुपये) मिळाले. ट्विटर, फेसबुक आणि तत्सम कंपन्या कोणत्याही प्रकारच्या हार्डवेअर किंवा सॉफ्टवेअरचे उत्पादन करत नाहीत. तरीही गुंतवणूकदारांनी या कंपन्या मौल्यवान वाटतात. याचे कारण एकच-डेटा. या कंपन्यांकडे असणारा त्यांच्या कोट्यवधी वापरकर्त्यांचा डेटा आणि दररोज हा डेटा निर्माण करून, साठवून त्याचे विश्लेषण करण्याची त्यांची अफाट क्षमता! फेसबुकच्या अडीचशे कोटी वापरकर्त्यांच्या वैयक्तिक माहितीचे, त्यांच्याकडून नित्यनियमाने तयार होणाऱ्या डेटाचे आणि त्याप्रमाणे त्यांच्या आवडीनिवडी, प्राधान्यक्रम, सामाजिक/राजकीय मते, आर्थिक स्तर अशा प्रकारच्या आकलनाचे आकर्षण हे केवळ खासगी कंपन्यांना आपल्या उत्पादनाची जाहिरात योग्य व्यक्तींना दाखवण्यापुरते मर्यादित नसते, तर **राज्यसत्तादेखील नागरिकांच्या हालचाली, कृतींवर पाळत ठेवण्यासाठी या माहितीचा पुष्कळ उपयोग करत असते.** फेसबुकच्या संदर्भात 2019 लोकसभा निवडणुकीवेळी उघडकीस आलेला **केंब्रिज नालिटीका घोटाळा याचेच एक प्रातिनिधिक उदाहरण आहे.**



जगभरातील अनेक कंपन्या वापरकर्त्यांची संमती न घेता किंवा जबरदस्ती सहमती घेऊन त्यांचा डेटा विकत आहेत. **जानेवारी महिन्यात वापरकर्त्यांची काही माहिती गोपनीय राहणार नाही असे सांगणारे धोरण व्हॉट्सअॅपने जाहीर केले होते.** म्हणजेच वापरकर्त्यांची माहिती व्हॉट्सअॅप तिच्या मालक कंपनी म्हणजे फेसबुकला देऊ शकते असे ते धोरण होते. परंतु जगभरातून वापरकर्त्यांनी दर्शविलेल्या विरोधामुळे व्हॉट्सअॅप त्यांचा फेरविचार करत आहे. आपल्या देशातसुद्धा सरकारने माहिती खाजगी राहायला हवी याच सुरात मत दिले, पण हे फक्त मगरीचे अश्रू आहेत. **नागरिकांच्या खाजगी गोष्टींवर, आणि त्याद्वारे विरोधकांवर नजर ठेवता यावी यासाठी या सरकारांना स्वत:ला डेटा तर पाहिजे आहे. भारत सरकारने जे आयटी नियम 2021 बनवले आहेत, त्याद्वारे अशा सर्व कंपन्यांना सरकारला माहिती देणे बाध्यकारक केले गेले आहे.** कोरोनाकाळात आरोग्य सेतू हे सरकारी अॅप केंद्र सरकारने प्रकाशित केले आणि देशातील सर्व नागरिकांना ते आपापल्या स्मार्टफोन्सवर इन्स्टॉल करण्यास सांगितले. परंतु सरकारने कोरोनाच्या निमित्ताने घेतलेली माहिती किती दिवस ठेवली जाईल, त्याचा वापर कोण करू शकतो या सर्व प्रश्नांवर सरकारचे कोणतेच स्पष्टीकरण नाही. **'आधार' प्रकरण ही तसेच. आधार क्रमांक बँक खात्याशी जोडणे, आयकराशी जोडणे याचे बंधन सरकारने प्रत्येकाला घातले आहे.** एका ओळख क्रमांकाचा वापर करून व्यक्तीची सर्व माहिती सरकारकडे असावी हेच त्यामागचे उद्दिष्ट आहे. **नागरिकांवर पाळत ठेवण्याचा हा सरकारचा डाव आहे.** असे करताना खाजगी माहितीच्या अधिकाराचे उल्लंघन होत आहे अशा तक्रारींकडे सरकारने कानाडोळा केला.

एवढा प्रचंड डेटा दररोज निर्माण होत असतानां देखील अजूनही त्याचे नियमन आणि संरक्षण करण्याकरिता, आणि जनतेला तिच्या निजी माहितीच्या निजतेची आणि सुरक्षेची हमी देण्याकरिता भारतात आज कोणतेही कायदे नाहीत. 2017 मध्ये सर्वोच्च न्यायालयाने गोपनीयतेच्या अधिकाराला मूलभूत अधिकार म्हणून जाहीर केले खरे परंतु त्याची अंमलबजावणी करण्यासाठी कायदेच अस्तित्वात नाहीत. हे जाहीर करताना सुद्धा **सर्वोच्च न्यायालयाने नागरिकांच्या डेटावर सरकारचा अधिकार नसावा, अशा कोणत्याही ठोस तरतूदी सुचवल्या नाहीत.** समाजमाध्यमांवरील खाजगी माहिती आणि सार्वजनिक माहिती यांचा आवाका स्पष्ट नाही. एका सर्वेनुसार जगभरात इंटरनेटचा वापर करणाऱ्यांपैकी फक्त 33% **जनतेलाच माहितीची गोपनीयता काय असते हे माहित होते. भारतात हे प्रमाण नक्कीच आणखी कमी असणार आहे.** इंटरनेटवरील माहिती गोपनीयतेच्या संरक्षणाच्या धोरणांमध्ये पोकळी निर्माण झाल्याचे लक्षात घेऊन अनेक डिजिटल कंपन्यांचे मालक भारतातील वापरकर्त्यांच्या माहितीचा गैरवापर करणारी धोरणे लागू करत आहेत. व्हॉट्सअॅपचे नवीन डेटा धोरण त्याचेच उदाहरण आहे. अनेकांना वाटत असते की इंटरनेटवरील विविध माध्यमांद्वारे ज्या माहितीचे आदान-प्रदान होत आहे, त्यात लपवण्यासारखे काहीच नाही. तेव्हा निजतेची एवढी काळजी का करायची? जरी कुणाला आपली माहिती गोपनीय वाटत असेल किंवा नसेल, तिच्या सुरक्षेची पुरेशी काळजी घेतली गेली नाही तर विविध प्रकारच्या सायबर हल्ल्यांना तोंड द्यावे लागू शकते. वास्तवात सामान्य माणसाच्या कल्पनेपलीकडे या माहितीचा वापर जाहिराती, हेरगिरी, राजकारण यासाठी केला जातो. या माहितीचा वापर करून आपल्या व्यक्तित्वावर होणारा घाला, त्यामुळे होणारे मानसिक व आर्थिक शोषण, डिजिटल हेरगिरीच्या सततच्या जाणिवेमुळे अभिव्यक्तीवर येणाऱ्या मर्यादा, अशा प्रकारच्या परिणामांचा आपल्याला कळत-नकळत सामना करावा लागतो. **सामान्य जनतेवर सरकार करत असलेल्या हेरगिरीचा वापर खरेतर विरोधक, जनापक्षदार कार्यकर्ते यांच्यावर पाळत ठेवण्यासाठी आणि त्यांच्या दमनासाठी केला जातो.**

**एडवर्ड स्नोडेन, ज्युलियन असांज, रियालिटी विनर** यांसारखे 'व्हिसलब्लोवर्स' सरकार आणि खाजगी कंपन्यांकडून होणाऱ्या देशविदेशांतील माहितीचौर्याच्या आणि डिजिटल हेरगिरीच्या अशा अनेक घटनांचा पर्दाफाश करत आले आहेत.  त्यामुळे आता हे कुठलेही लपलेले गुपित राहिलेले नाही की **जगभरातील सरकारेच आपल्या नागरिकांच्या प्रत्येक ऑनलाईन कृतीवर नजर ठेवून असतात.**

परंतु या सर्वामध्ये समजण्याचा भाग हा की भांडवली अर्थव्यवस्थेमध्ये जेव्हा माल विक्रीची व्यवस्था सर्व जग कवेत घेऊ लागते, तेव्हा कोणतीही गोष्ट विकायला निघू शकते. जर हवा, पाणी, जमिन विकले जाऊ शकतात तर माहिती सुद्धा विकली जाऊ शकते. भांडवली अर्थव्यवस्थेचे संकट वाढत असताना, मंदी वाढत असताना, अर्थव्यवस्था सतत जुगारी होत चाललेली असताना, एका अशा गोष्टीचा वापर करून पैसे कमावले जात आहेत, जी खरेतर खरेदी-विक्रीची गोष्ट होऊ शकते, हेच हास्यास्पद वाटेल. पण आज माहितीचा धंदा करून फेसबुक, गूगल, ट्विटर सारख्या कंपन्या आज अनेक देशांच्या अर्थव्यवस्थांपेक्षा मोठ्या झाल्या आहेत. जरी देशातील सरकारने माहिती गोपनीयतेविषयी सकारात्मक कायदे लागू केले तरीही त्यांची अंमलबजावणी किती होईल याची शंकाच आहे. कारण अनेक समाजमाध्यम कंपन्यांचा सत्तेशी सरळ संबंध असतो आणि सत्ता टिकवण्यात त्यांचा मोलाचा वाट असतो. भारतातील 2019च्या लोकसभा निवडणुकीमध्ये फेसबुकने भाजप समर्थनार्थ अनेक पोस्ट व्हायरल केल्या आणि अनेक विरोधी पोस्ट काढून टाकल्या. नफ्यावर आधारलेल्या समाजव्यवस्थेत व्यक्तींची खाजगी  माहिती गोपनीय ठेवणे हे खूप कठीण आहे. हे तर नक्कीच की जाहिरातींचा भडीमार जास्तीत जास्त ग्राहकांवर करण्यासाठी खाजगी कंपन्या आणि नागरिकांवर पाळत ठेवण्यासाठी या डेटाचा वापर करून सरकारे भांडवली व्यवस्थेच्या चौकटीला आणखी बळकट बनवत आहेत.

# जनतेला लुटून भांडवलदारांचे खिसे भरण्याचे काम वेगाने सुरू

पान 1 वरून

**खेळ तात्पुरते केले जातील आणि जनतेला फसवण्याचा धंदा असाच चालू राहिल.**

एवढे पुरेसे नाही म्हणून की काय आता मोदी सरकारच्या तालावर नाचणाऱ्या रिझर्व बँकेने कॉर्पोरेट घराण्यांना बँका उघडण्याची परवानगी दिली आहे. थोडक्यात आता जनतेच्याच पैशांवर गब्बर झालेल्या या उद्योगपतींना, स्वत:च बँकमालक बनून स्वत:लाच कर्ज देण्याची, कायद्याच्या कचाट्यातून आणि उत्तरदायित्वातून सुटका करून घेण्याची सोय झाली आहे.

याशिवाय आतापर्यंत सरकारी बँकांच्याच अधिक्षेत्रात असलेल्या सर्व कामांमध्ये, जसे करभरणा, पेंशन वितरण, छोट्या गुंतवणूक योजना, खाजगी बँकांनाही प्रवेशाची परवानगी सरकारने दिली आहे. थोडक्यात **सरकारी कामांमधूनही आता खाजगी बँकांना पैसे कमावण्याची खुली सुट दिली गेली आहे.**

## विमा खाजगीकरण

देशभरातील 40 कोटी जनतेचा पैसा ज्या भरवशाच्या एल.आय.सी. मध्ये गुंतवलेला आहे, त्या एल.आय.सी.चे सुद्धा खाजगीकरण आता मोदी सरकारने काढले आहे. केंद्र सरकारने विमा क्षेत्रात विदेशी गुंतवणूकीचे प्रमाण 49 टक्क्यांवरून वाढवून 74 टक्के केले आहे. थोडक्यात अत्यंत वखवखलेल्या विदेशी विमा कंपन्यांना आता भारताच्या विमा क्षेत्रावर नियंत्रण करता येईल. हे लक्षात घेतले पाहिजे की विम्याचा दावा देण्यामध्ये विदेशी कंपन्यांची कामगिरी ही भारतीय कंपन्यांच्या तुलनेत प्रचंड वाईट राहिली आहे. जनतेच्या पैशांची लूट करण्यात यांचा हात धरणारे कोणी नाही. हे सुद्धा लक्षात घेतले पाहिजे की या निर्गुंतवणूकीचा अर्थ आहे मोठ्या प्रमाणात **एल.आय.सी. सारख्या कंपन्यांच्या शेअर्सवर आता शेअर बाजारात सट्टा लागेल.** शेअरबाजारात, जे खरेतर सट्टाबाजाराच आहेत, ज्या प्रकारे वित्तीय भांडवलदारांच्या अवाढव्य जुगाराच्या खेळात प्रचंड चढ-उतार येतात, अशामध्ये **जनतेचा पैसा निश्चितपणे धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही.**

हे सुद्धा लक्षात घ्यावे की आय.डी.बी.आय. बँकेमध्ये सरकारचा हिस्सा 47.11 टक्के आहे आणि 51 टक्के हिस्सा एल.आय.सी. कडे आहे. त्यामुळे **एल.आय.सी.चे खाजगीकरण म्हणजे पर्यायाने आय.डी.बी.आय. बँकेचे सुद्धा खाजगीकरण आहे.** आय.एल.एफ.एस. सारख्या बांधकाम उद्योगात प्रमुख भुमिका असलेल्या कंपनीला आणि आय.डी.बी.आय. बँकेला वाचवायला सरकारने एल.आय.सी.चाच आधार घेतला होता, आणि आता खुद्द एल.आय. सी.चेच खाजगीकरण चालवले आहे. तेव्हा मोदी सरकार अगोदरच संकटात असलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेला अधिक मोठ्या गंभीर संकटाकडे वेगाने ढकलत आहे हे निश्चित.

## सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांचे खाजगीकरण

या अगोदरच कोरोना काळात मे 2020 मध्ये निर्मला सितारामन यांनी जाहीर केले होते की सरकार सर्व गैर-महत्वाच्या (non-strategic) सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे खाजगीकरण करेल, आणि महत्वाच्या क्षेत्रातही फक्त 4 कंपन्या शिल्लक ठेवेल. **सगळा देश कॉर्पोरेट कंपन्यांच्या घशात घालण्याचे मोदी सरकारचे इरादे स्पष्ट आहेत!** मोदींनी आपल्या 'मन की बात' मध्ये खरा इरादा उघडपणे मांडला आहे. जनतेच्या घामातून, पैशातून उभ्या राहिलेल्या 100 सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांना, ज्यांची किंमत तब्बल 2.5 लाख कोटींपेक्षा जास्त आहे, खाजगी करण्याचा इरादा मोदींनी जाहीर केला आहे.

एअर इंडिया आणि बी.एस.एन.एल. ला विकण्याची प्रक्रिया तर काही वर्षांपासून चालूच आहे आणि लवकरच पूर्ण खाजगीकरणाला आकार दिला जाईल. याशिवाय सागरी वाहतुकीच्या क्षेत्रातील मोठ्या कंपन्या म्हणजे शिपिंग कॉर्पोरेशन, कंटेनर कॉर्पोरेशन; खाण क्षेत्रातील भारत अर्थ मूव्हर्स कंपनी; हेलिकॉप्टर वाहतूक करणारी पवनहंस कंपनी; स्टील क्षेत्रातील राष्ट्रीय इस्पात लिमिटेड आणि निलांचल इस्पात लिमिटेड; खते आणि रसायने क्षेत्रातील प्रोजेक्ट ऍंड डेव्हलपमेंट इंडिया लिमिटेड; आरोग्यक्षेत्रातील हॉस्पिटल सर्व्हिसेस कन्सल्टंसी लिमिटेड; घरे-धरणे इत्यादी बांधकाम क्षेत्रातील नॅशनल प्रोजेक्ट कंस्ट्रक्शन कॉर्पोरेशन, ब्रीज ऍंड रूफ कंपनी लिमिटेड आणि इंजिनिअरींग प्रोजेक्ट (इंडिया) लिमिटेड; वर्तमानपत्राचा कागद पुरवणारी हिंदुस्थान न्युजप्रिंट लिमिटेड; विक्रम सारख्या रिक्षा बनवणारी स्कूटर्स इंडिया लिमिटेड; रसायन क्षेत्रातील हिंदुस्थान फ्ल्युरोकार्बन लिमिटेड सुद्धा विकल्या जाणार आहेत.याशिवाय इंधनतेल क्षेत्रातील मोठी कंपनी असलेल्या भारत पेट्रोलियम चे खाजगीकरण निर्णायकरित्या पुढे नेण्याचे मोदी सरकारने जाहीर केले आहे.

रेल्वेच्या बाबतीत तर खाजगीकरण केव्हाच पुढे गेले आहे. 51 रेल्वे मार्गांना खाजगी उद्योगांच्या ताब्यात देण्याचे धोरण बनले आहे. बजेट मध्ये म्हटले आहे की 7 बंदरांचे (पोर्ट्सचे) संचालन खाजगी-सार्वजनिक भागीदारीद्वारे केले जाईल. हे विसरू नये की अगोदरच 12 अशी बंदरे अडानी ग्रुपला मोदींनी केव्हाच देऊन टाकली आहेत.

## सरकारी संपत्ती सुद्धा विक्रीला

विविध कंपन्यांच्या खाजगीकरणा सोबतच मोदी सरकारने विविध प्रकारची सरकारी संपत्ती सुद्धा सरळ विकायला काढली आहे. यामध्ये राष्ट्रीय हायवे अथोरिटीच्या अंतर्गत येणारे अनेक टोल-रस्ते, वीजवहन क्षेत्रातील वीजवहनाचे जाळे, तेल आणि गॅसच्या पाईपलाईन्स, रेल्वेच्या माल वाहतुकीचे काही मार्ग, अनेक विमानतळे (6 विमानतळ तर अगोदरच अडानी ग्रुपला दिले गेले आहेत!), अनेक गोदामे, खेळाची मैदाने, आणि अनेक ठिकाणी असलेल्या सरकारी जमिनी 'विक्रीला' काढल्या आहेत. 'मुद्रीकरण' म्हणजे पैशाच्या रुपात परिवर्तित करण्याच्या नावावर कवडीमोल भावाने ही संपत्ती उद्योगपतींच्या हवाले केल्या जाणार आहे हे निश्चित.

## मोदींच्या भूलथापा

खाजगीकरणाला कारण देताना मोदींनी म्हटले आहे की खाजगी क्षेत्रामुळे जास्त 'कार्यक्षम' रोजगार तयार होतील. **जास्त 'कार्यक्षम' चा अर्थच आहे की कामगारांकडून जास्तीत जास्त काम करवले जाईल** आणि खाजगी मालकांचा नफा वाढवला जाईल.

पुढे त्यांनी कारण देत म्हटले आहे की "या कंपन्यांच्या संचालनामध्ये अधिकाऱ्यांचे गुंतून राहणे हा त्यांच्या क्षमतांचा अपव्यय आहे". आजपर्यंत इतर अधिकाऱ्यांनी जनतेसाठी काय केले होते की हे कंपन्यांमध्ये गुंतलेले अधिकारी आता दुसरे काही करणार आहेत? मोदींनी म्हटले आहे की **"या कंपन्या निर्माण झाल्या तो काळ वेगळा होता, आणि आत्ताचा काळ वेगळा आहे." नक्कीच वेगळा आहे.** गरज सरो आणि वैद्य मरो च्या धर्तीवर आता भांडवलदार वर्गाला या कंपन्यांच्या सरकारी अस्तित्वाची गरज सरली आहे. कशी ते समजणे आवश्यक आहे. स्वातंत्र्यानंतर **नेहरूंच्या तथाकथित 'मिश्र' अर्थव्यवस्थेच्या काळात या कंपन्या बनल्या. या काळात भारतातील भांडवलदार वर्ग अत्यंत कमजोर होता,** आणि त्याची भांडवलाची शक्ती मर्यादित होती. पायाभूत उद्योग मोठ्या भांडवलाची आणि परताव्यासाठी दीर्घ प्रतिक्षेची मागणी करणारे असतात. अशामध्ये टाटा-बिर्ला सारख्या उद्योगपतींनी आपल्या पाईक कॉंग्रेस पक्षामार्फत असेच धोरण आखले की मोठी भांडवली गुंतवणूक लागणारे कारखाने सरकारी, म्हणजेच जनतेच्या, पैशाने स्थापले जातील. या सरकारी उद्योगांनी खाजगी उद्योगधंद्यांच्या मालासाठी ग्राहकही निर्माण करण्याचे काम केले. **70 वर्षात जेव्हा कामगारांच्या श्रमशक्तीच्या लुटीतून आणि जनतेच्या पैशातून घेतलेल्या कर्जाच्या जीवावर हे उद्योगपती गब्बर झाले आहेत, लाखो-कोटींच्या भांडवलाचे धनी झाले आहेत, तेव्हा आता हे सर्व पायाभूत उद्योग आता त्यांना गिळायला हवे आहेत.** तेव्हा मोदी म्हणतात तो काळ नक्कीच वेगळा आहे - पण भांडवलदार वर्गासाठी! कष्टकरी जनता तेव्हाही उपाशीच होती आणि आत्ताही!

मोदीचे म्हणणे आहे की "उद्योग चालवणे हा काही सरकारचा उद्योग नाही. सरकार जेव्हा रोखीकरण करते (म्हणजे उद्योग विकते-लेखक) तेव्हा ती जागा खाजगी क्षेत्र भरून काढते. खाजगी क्षेत्र गुंतवणूक घेऊन येतो आणि जगातील सर्वोत्तम कार्यपद्धती सुद्धा." याचा अर्थ काय? भारतातील भांडवलदार वर्ग आता जनतेच्या पैशांचे ढेकर देत कुंभकर्णी आकार घेऊन बसला आहे, तेव्हा त्याच्या गरजांसाठी चालवलेले उद्योग सरकारने आता चालवायला नकोत हे तत्वज्ञान पाजळणे पुन्हा चालू झाले आहे. अगोदरही हे उद्योग त्यांच्या सेवेसाठीच होते आणि आत्ताही तसेच आहे. मोदी जेव्हा जगातील सर्वोत्तम कार्यपद्धती म्हणतात तेव्हा त्याचा अर्थ कामगारांना पिळून, जास्तीत जास्त काम करायला लावणाऱ्या पद्धती हाच आहे.

## सर्वसहमतीने चाललेली लूट

हे लक्षात घेतले पाहिजे की सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांमधील समभागांची विक्री किंवा खाजगीकरण 1991 साली चालू झालेल्या खाजगीकरण-उदारीकरण-जागतिकीकरणाच्या (खाउजा) धोरणांपासून सुरू झाले. कॉंग्रेस, कॉंग्रेसप्रणीत युपीएची दोन्ही सरकारे, तिसऱ्या आघाडीचे (युनायटेड फ्रंट) 1996-1998 मधील सरकार, वाजपेयी सरकार या सर्वांनीच उद्योगांचे खाजगीकरण चालूच ठेवले. उपलब्ध आकड्यांना 2019-20 च्या महागाई निर्देशांकाच्या तुलनेत अंदाजे बघितल्यास दिसून येते की पी.व्ही. नरसिंह रावांच्या कॉंग्रेस सरकारने 1991-96 या काळात 53,675 कोटींचे, तिसऱ्या आघाडीने 1996-98 या काळात 22,287 कोटींचे, वाजपेयी सरकारने 1999-2004 या काळात 81,208 कोटींचे, कॉंग्रेसप्रणीत युपीए सरकारने 2004-14 या काळात 1,52,851 कोटींचे, आणि मोदी सरकारने 2014 पासून 3,16,700 कोटींचे खाजगीकरणाचे प्रस्ताव रेटले. वाजपेयी सरकारने दरवर्षी जवळपास 16,241 कोटी रुपये दराने तर युपीए सरकारने सुद्धा आपली 'लायकी' भांडवलदारांना सिद्ध करत दरवर्षी 15,285 कोटी रुपये दराने खाजगीकरण करवले. पण **दरवर्षी जवळपास 52,783 कोटी रुपये या दराने मोदीने खाजगीकरणाचे अगोदरचे सर्व विक्रम मोडीत काढले आहेत. तेव्हा मोदी सरकार देशभरातील भांडवलदारांचे लाडके आहे, यात काय आश्चर्य?**

ही खाजगीकरणे म्हणजे अजून काही नाही तर सार्वजनिक संपत्ती उद्योगपतींना कवडीमोल भावाने विकण्याचे काम आहे. दोन उदाहरणे घेऊयात. वाजपेयी सरकारच्या काळात अरुण शौरी यांच्या 'नेतृत्वात' बाल्को कंपनी अनिल अग्रवाल यांच्या वेदांता उद्योगसमुहाला 550 कोटींना विकली गेली, जेव्हा तिचे बाजारमूल्य 5,000 कोटींच्या वर होते. याच काळात व्ही.एस.एन.एल. टाटांना 2,591 कोटींना विकली गेली जेव्हा कंपनीकडे असंख्य मालमत्तांसहीत रोख रक्कमच 3,000 कोटी रुपये होती. तेव्हा भांडवली **विरोधी पक्ष या खाजगीकरणाविरोधात जे गळे काढत आहे ते फक्त मगरीचे अश्रू आहेत हे विसरता कामा नये!.**

## जनतेची लूट चालूच आहे

कोरोना काळात भांडवलदारांच्या संपत्तीत तब्बल 35 टक्के वाढ झाली. तरीही सरकारने ना त्यांच्यावर आयकर वाढवला, ना कॉर्पोरेट टॅक्स, ना भांडवली नफा कर (कॅपिटल गेन्स टॅक्स). यावर त्यांना सार्वजनिक उद्योग, सरकारी संपत्तीची खैरात वाटली जात आहे. दुसरीकडे पेट्रोल-डिझेलवर मात्र 47 टक्क्यांपर्यंत एक्साईज कर वाढवून जनतेच्या खिशातून मात्र लाखो कोटींची वसुली चालवली आहे. 'सबका साथ, सबका विकास' सारखे दावे करणारे भाजप सरकार असो, वा 'कॉंग्रेस का हाथ, गरिबों के साथ' म्हणणारे कॉंग्रेस सरकार, लोकशाहीचा आभास निर्माण करणाऱ्या राज्यसत्तेचे फक्त भांडवलदार वर्गाच्या नफ्यासाठी काम करणारे नागडे रूप आपल्यासमोर आहे.

**हा भ्रम आहे की 'सरकारी उद्योग' हे समाजवादाचे प्रतीक आहेत.** उत्पादन साधनांवर खाजगी मालकीची परवानगी देणाऱ्या, राज्यसत्तेवर भांडवलदार वर्गाचे नियंत्रण असणाऱ्या भांडवलशाहीमध्ये 'सरकारी' संपत्ती ही भांडवलदार वर्गाची सामुदायिक संपत्ती असते आणि सरकारे भांडवलदार वर्गाचे सामुहिक हित जपण्यासाठी तिला वापरतात. परंतु ही संपत्ती तर जनतेनेच निर्माण केलेली असते. अप्रत्यक्षपणे या सरकारी संपत्तीमुळे कामगार वर्गाला विविध कल्याणकारी योजना, काही सवलती नक्कीच मिळतात. आज भांडवलदार वर्ग आपापसात या संपत्तीची आपापसात पुनर्वाटणी करत असताना फक्त या खाजगीकरणा विरोधात नाही तर एकंदरीत खाजगी मालकी नष्ट करण्याकरिताच क्रांतिकारी चळवळींनी संघटित झाले पाहिज

# विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्या: नफेखोर शिक्षणव्यवस्थेचे बळी !

पान 1 वरून

फक्त 800-900 विद्यार्थ्यांनाच मिळणार आहे. राज्यातील एम.पी.एस.सी चा विचार केला तर 200-300 जागांसाठी 4 ते 5 लाख विद्यार्थी दरवर्षी अर्ज करतात. 1 वर्षाआधी रेल्वेच्या 90 हजार जागांसाठी तीन कोटी पेक्षा जास्त अर्ज आले होते. सध्या बेरोजगारीची एवढी भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे की टायपिस्ट, गार्ड सारख्या पदांसाठी सुद्धा एम.फिल, पी.एच.डी. झालेले विद्यार्थी अर्ज करत आहेत. अशा बेरोजगारीच्या परिस्थिती मध्ये विद्यार्थी मेहनत करून अभ्यास करतात मात्र जागाच कमी निघत असल्यामुळे बहुसंख्य विद्यार्थ्यांच्या पदरी निराशाच येते.

**ज्या थोड्या बहुत सरकारी जागा रिकाम्या आहेत त्या सुद्धा भरल्या जात नाहीत.** मोदी सरकारने लोकसभा आणि राज्यसभेत दिलेल्या प्रश्नांच्या उत्तरांचा अभ्यास करून न्युजक्लिक या पोर्टल वर आलेल्या एका लेखानुसार देशात 60 लाख सरकारी पदे रिक्त आहेत. अनेक विद्यार्थी उच्च शिक्षण या आशेवर घेतात की त्यांना सरकारी नोकरी मिळेल. परंतु एक तर सरकारी नोकऱ्याच अत्यंत अत्यल्प आहेत आणि ज्या थोड्या बहुत आहेत त्याही भरल्या जात नाहीत. **अनेक विद्यार्थ्यांना नाईलाजास्तव कामासाठी कामगार नाक्यांवर उभे रहावे लागत आहे.** पुणे, मुंबई सारख्या मोठ्या शहरात अनेक छोट्या शहरातून विद्यार्थी स्पर्धा परीक्षांची तयारी करायला येतात. 4-5 वर्ष राहतात, तिथे राहण्यासाठी पैसे खर्च करतात, प्रचंड मेहनत करतात परंतु बहुसंख्य विद्यार्थ्यांच्या हाती मात्र शेवटी निराशाच लागते. याच निराशेमुळे अनेक विद्यार्थ्यांना मानसिक त्रासाला सामोरे जावे लागते आणि या त्रासातूनच अनेक जण आत्महत्येचा मार्ग निवडतात. रोजगाराचा अभाव हे विद्यार्थी आत्महत्येमागील सर्वात महत्वाचे कारण आहे.

सुरुवातीला दिलेल्या दोन उदाहरणांमध्ये दिसते की स्पर्धा परिक्षांमध्ये अपयशाची भीती हे आत्महत्येचे तात्कालिक कारण होते. ही भीती मुळात निर्माण होते अत्यंत कमी जागा आणि त्यांनी निर्माण केलेल्या अल्पत्य संधीमुळे. **तेव्हा स्पर्धा परिक्षेच्या तणावाचे आत्महत्या बळी हे बेरोजगारीचेच बळी आहेत!**

**बेरोजगारी नफेखोर भांडवली व्यवस्थेची देणगी आहे.** भांडवली व्यवस्थेला बेरोजगारांच्या राखीव फौजेची आवश्यकता असते जेणेकरून एकाच जागेसाठी अनेक जण स्पर्धा करतील आणि त्या स्पर्धेचा फायदा भांडवलदार वर्ग मजुरी कमी करण्यासाठी करून घेईल. मोदी सरकारने दरवर्षी 2 कोटी रोजगार देण्याचा वायदा केला होता मात्र रोजगार देण्याचे तर सोडाच उलट जे थोडे बहुत रोजगार होते ते ही हिरावून घेण्याचे काम मोदी सरकारने केले आहे. आज बेरोजगारीची एवढी भीषण स्थिती आहे की 4,000-5,000 रुपयात काम करायला सुद्धा लोक नाईलाजाने तयार होतात. आज जर शिक्षित बेरोजगारांची संख्या 4 कोटीच्या वर असेल तर त्यावरून स्पष्ट आहे की उच्च शिक्षण घेऊन मिळवलेल्या पदवीला बाजारात शून्य किंमत आहे. आज तुम्ही कितीही शिक्षण घ्या, बहुसंख्याक जनतेला मात्र बेरोजगारांच्या फौजेत सामील होऊन कामगार नाक्यावर उभे राहून कसेबसे आयुष्य जगण्याशिवाय गत्यंतर नाही. या सर्व परिस्थिती मुळेच विद्यार्थ्यांसमोर अंधकार आणि अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. याचीच परिणती आपण वाढत्या विद्यार्थी आत्महत्येच्या स्वरुपात बघू शकतो.

**10 मार्च रोजी महाराष्ट्र भर विद्यार्थ्यांनी आंदोलन केले.** आंदोलनाचे कारण होते महाराष्ट्र सरकारने एम.पी.एस.सी च्या परीक्षेची तारीख पुढे ढकलली जेव्हा की परीक्षा 4-5 दिवसांवर आली होती. आधीच एम.पी.एस.सी. परीक्षा कोरोना लॉकडाऊन च्या काळात 4 वेळा सरकारने पुढे ढकलली होती. जेव्हा देशभरात सर्व गोष्टी सुरू झाल्या आहेत सरकार मात्र **कोरोना महामारीचा बहाणा बनवून आपले विद्यार्थी विरोधी धोरण राबवत आहे. सरकारला कारणच हवे आहे, रिक्त आहे त्या जागा सुद्धा न भरण्यासाठी.** सध्या लाखो सरकारी पदे रिक्त आहेत मात्र ही पदे भरली जात नाहीत. देशभरात अनेक राज्यांमध्ये निवडणुकीसाठी सभा घेण्यासाठी परवानगी दिली जाते मात्र त्याच वेळी परीक्षा घेताना मात्र सरकारला कोरोना संसर्ग पसरण्याची भीती वाटते. कोरोनाचा प्रादुर्भाव होऊ नये याची सर्व खबरदारी घेऊन परीक्षा घेणे शक्य असताना सरकार आपला विद्यार्थी विरोधी आणि भांडवलदार धार्जिणा चेहरा खुलेपणाने उघडा करत आहे. परंतु विद्यार्थ्यांनी सुद्धा समजून घेणे गरजेचे आहे की परीक्षा वेळेवर होत नाही यासाठी तर संघर्ष करायलाच हवा परंतु खरा संघर्ष तर प्रत्येकाला रोजगार मिळाला पाहिजे यासाठीचा आहे. एम.पी.एस.सी. ची परीक्षा वेळेवर झाली तरी 4-5 लाख विद्यार्थ्यापैकी फक्त 200-300 विद्यार्थ्यांनाच रोजगार मिळणार आहे बाकी सर्वांनी कितीही मेहनत केलेली असली तरी त्यांना बेरोजगारांच्या फौजेत सामील होण्याशिवाय पर्याय नाही.

**महागड्या, नफेखोर शिक्षणामुळे शिक्षणाच्या संधींचा अभाव हे सुद्धा विद्यार्थी आत्महत्येचे महत्वाचे कारण आहे.** कोरोना महामारीनंतर सर्व शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे बंद आहेत. सर्व शिक्षण ऑनलाइन पद्धतीने सुरू आहे. ऑनलाइन शिक्षणासाठी लागणारी संसाधने जसे की इंटरनेट, स्मार्टफोन, लॅपटॉप ही सरकारने पुरवायला हवी होती मात्र सरकारने आपली जबाबदारी झटकून तो बोजासुद्धा विद्यार्थ्यांवरच टाकला आहे. **केरळमधील देविका असू द्या किंवा महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील ऐश्वर्या या दोन्ही मुलींनी ऑनलाइन शिक्षण जमत नसल्यामुळे, ऑनलाइन शिक्षणाठी लागणारी संसाधने नसल्यामुळे आत्महत्या केली.** शिक्षणासाठी लागणाऱ्या संसाधनांच्या अभावामुळे अनेक विद्यार्थी निराश होऊन आत्महत्या करतात. 'दि हिंदू' नावाच्या वर्तमानपत्रात प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार विद्यार्थी आत्महत्या होण्यात शिक्षणासाठी लागणाऱ्या संसाधनांचा अभाव हे एक मोठे कारण आहे. ऑनलाइन शिक्षणाच्या माध्यमातून आधीच विषम असलेल्या शिक्षण व्यवस्थेला अजून विषम बनवून विद्यार्थ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ या भांडवली व्यवस्थेने आणली आहे. कामगार कष्टकरी वर्गातील विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षण घेणे जवळपास असंभव झाले आहे. ऑनलाइन शिक्षणातून शिक्षण घेता येत नसल्याने झालेल्या आत्महत्यांमध्ये बहुसंख्यांक आत्महत्या या कामगार कष्टकरी वर्गातील विद्यार्थ्यांनी केल्या आहेत.

भांडवली व्यवस्थेने शिक्षण व्यवस्थेला शिक्षण घेऊन पदवी मिळवून भांडवलदाराकडे कमी मजुरीवर काम करण्यासाठी कारकून बनवण्यासाठीची फॅक्टरी बनवून ठेवले आहे. **शिक्षणाचा उद्देश फक्त चांगले गुण मिळवून एखाद्या भांडवलदाराकडे कमी मजुरीत काम करणे एवढाच बाकी राहिला आहे. या चांगले गुण मिळवण्याच्या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये अपयश, निराशा आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.** विद्यार्थी सतत याच भीतीमध्ये जगत असतात की कमी गुण मिळाले तर काय होईल. यामुळे विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. अनेक विद्यार्थी सतत मानसिक दडपणाखाली जगत असतात. अनेक विद्यार्थी डिप्रेशन आणि इतर मानसिक आजारांचे बळी ठरतात. दरवर्षी अनेक विद्यार्थी परीक्षेत कमी गुण मिळाल्यामुळे, परीक्षेत नापास झाल्यामुळे किंवा कमी गुण मिळाल्यामुळे निराश होऊन आत्महत्या करतात. जो पर्यंत व्यक्तीला विचारशील, तार्किक, वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करुन एक संवेदनशील व्यक्ती बनवण्यासाठी शिक्षण दिले जाणार नाही आणि पदवी मिळवून भांडवलदारांच्या फॅक्टरी मध्ये काम करण्यासाठी कारकून बनवण्याचे साधन बनून राहील तो पर्यंत या परिस्थिती मध्ये फारसा फरक पडणार नाही.

भाजपा सरकारने एकदम मनमानी पद्धतीने नवीन शिक्षण धोरण आणले आहे. नवीन शिक्षण धोरणातील तरतुदींचा अभ्यास केला तर लक्षात येते की नवीन शिक्षण धोरण 2020 हे जनतेच्या हक्कांप्रती नाही तर मोठ्या भांडवलाप्रती समर्पित आहे.

नवीन शिक्षण धोरण शिक्षणाच्या प्रत्येक स्तरावर घातक परिणाम करणार आहे. शिक्षण धोरणाचा आपण अभ्यास केला तर आपल्या स्पष्टपणे लक्षात येते की मोदी सरकारने शिक्षण व्यवस्था पूर्णपणे विकायला काढली आहे. आता पर्यंत जे थोडे बहुत शिक्षण मिळत होते ते सुद्धा मिळणे आता बंद होणार आहे. **नवीन शिक्षण धोरणातील मल्टिएन्ट्री आणि एक्झिट ची तरतूद हे दुसरे तिसरे काही नसून ड्रॉपआऊट ला (शिक्षण मधेच सोडण्याला) सरकारी मान्यता देण्या सारखेच आहे.** सरकारने नवीन शिक्षण धोरणात असे बदल सुचवले आहेत की जेणेकरून ज्यांच्याकडे शिक्षण विकत घ्यायला पैसे नसतील त्यांना शिक्षण अर्धवट सोडण्या शिवाय पर्याय उरणार नाही. नवीन शिक्षण धोरणानंतर ड्रॉप आऊटस च्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होणार आहे आणि येणाऱ्या काळात कामगार कष्टकरी वर्गातील विद्यार्थ्यांचे शिक्षण घेण्याचे स्वप्न उध्वस्त होणार आहे. स्ववित्तपोशीत अभ्यासक्रमांना उत्तेजन देण्याचा नवीन शिक्षण धोरणात उल्लेख आहे.. स्ववित्तपोशीत अभ्यासक्रमांना वाढवण्याचाच अर्थ आहे सरकारचा शिक्षणावरील खर्च कमी करणे. नवीन शिक्षण धोरणाने शिक्षण व्यवस्थेला भांडवलदारांच्या हातात सोपवले असल्याने ज्या थोड्या बहुत सरकारी नोकऱ्या शिक्षण व्यवस्थेत होत्या त्या सुद्धा आता नष्ट होणार आहेत. प्राथमिक शिक्षण जे आता पर्यंत सरकार शिक्षणाच्या अधिकाराखाली देत होते ते ही बाजारातून इतर गोष्टी विकत घ्याव्या लागतात तसे विकत घ्यावे लागण्याची वेळ नवीन शिक्षण धोरणाने आपल्यावर आणली आहे. अभ्यासक्रमात बदल करण्याच्या नावाखाली गाय विज्ञान, ज्योतिषशास्त्र, भूत विद्या सारखे विषय आणून अवैज्ञानिकता पसरवल्या जाणार आहे. शिक्षण घेण्याचे स्वप्न बघणाऱ्या कामगार कष्टकरी वर्गातील विद्यार्थ्यांच्या हाती निराशाच हाती लागणार आहे.

**आत्महत्या करणारा व्यक्ती असे पाऊल उचलतो कारण की प्रस्थापित समाजव्यवस्थेत त्या व्यक्तीला जीवन जगण्याची आशा उरलेली नसते. तेव्हा मूळ प्रश्न व्यक्तीचा नसून व्यक्ती ज्या सामाजिक संबंधांमध्ये जीवन जगतो, त्या सामाजिक संबंधांचा आहे.** मालक-कामगार असे सामाजिक संबंध स्थापित करणारी भांडवलशाही चालतेच ती नफ्यासाठी आणि नफ्यासाठी आवश्यक आहे कामगारांची पिळवणूक, किमान रोजगार आणि कमाल काम, बेरोजगारीचे अस्तित्व. जीवन जगण्याची निश्चिती येते रोजगारातून आणि भांडवली व्यवस्थेत रोजगार बेभरवशाचा असणार. रोजगारासाठी हवे शिक्षण आणि ते अत्यंत महागडे, नफेखोर व्यवस्थेच्या दावणीला बांधले गेले आहे; नियमितपणे केंद्र-राज्य सरकारांची धोरणे शिक्षणाला बाजारू आणि रोजगाराला दुर्लभ करत आहेत; आणि **भांडवली व्यवस्थेचे दोष विद्यार्थ्यांच्या माथी मारण्यासाठी सरकार स्पर्धांचे जाळे आणि तणाव वाढवत आहे; अशामध्ये विद्यार्थी आत्महत्या वाढणारच.** हे व्यक्तींनी स्वत:चे घेतलेले जीव नाहीत; तर नफ्याच्या व्यवस्थेने केलेले खून आहेत.

## 8 मार्च, आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने

पान 11 वरून

श्रम कायदे आहेत आणि संघटित कामगारांच्या अधिकृत प्रतिनिधींद्वारे त्यांचे प्रशिक्षण केले जात आहे. आम्ही प्रसुतीगृह, आया आणि मुलांच्या देखभालीसाठी केंद्र, अर्भके आणि मुलांच्या सांभाळासंबंधी अभ्यासक्रम, आया आणि मुलांच्या देखभाली संदर्भात प्रदर्शने आणि अशा अनेक गोष्टी संघटित करत आहोत. आम्ही गरजू आणि बेरोजगार महिलांच्या गरजा पूर्ण करण्याचा शक्य तो प्रत्येक प्रयत्न करत आहोत.”

“आम्ही चांगल्या पद्धतीने समजतो की कष्टकरी स्त्रियांच्या गरजांना पाहता हे सगळे फारच कमी आहे, आणि त्यांच्या खऱ्या मुक्तीच्या दृष्टीने तर हे एकदमच अपुरे आहे. तरीही, झारकालीन आणि भांडवली रशियामध्ये जे काही होते, त्याच्या तुलनेत हे एक पुढे टाकलेले पाऊल आहे. सोबतच, ज्या देशांमध्ये अजूनही भांडवलशाहीचा बोलबोला आहे, तेथील स्थितीच्या तुलनेत तर आम्ही चांगलेच आहोत. ही योग्य दिशेने एक चांगली सुरुवात आहे, आणि आम्ही याला सतत पुढे नेणार आहोत, आणि सगळी ऊर्जा लावून पुढे नेणार आहोत. तुम्ही, इतर देशांमधले साथी, आश्वस्त राहू शकता. कारण जाणाऱ्या प्रत्येक दिवसागणिक हे स्पष्ट होत आहे की कोट्यवधी स्त्रियांना सोबत घेतल्याशिवाय आपण पुढे जाऊ शकत नाही.”

# पॅरिस कम्युन: पहिल्या मजूर राज्याची सचित्र कथा (पुष्प पहिले)

आज भारतातच नाही, तर संपूर्ण दुनियेत कामगार भांडवली लुटखोरांच्या वेगवान होत चाललेल्या हल्ल्यांचा सामना करत आहेत, आणि कामगार आंदोलन विखुरलेपण, साचलेपणा, आणि हताशेने ग्रासलेले आहे. अशामध्ये इतिहासाची पाने उलटून कामगार वर्गाच्या गौरवशाली संघर्षांपासून शिकण्याचे आणि त्यांच्यापासून प्रेरणा घेण्याचे महत्व फार वाढते. **आजपासून 150 वर्षे अगोदर, 18 मार्च 1871 ला फ्रांसची राजधानी पॅरिस मध्ये पहिल्यांदा कामगारांनी आपले शासन कायम केले. याला पॅरिस कम्युन म्हटले गेले.** त्यांनी शोषकांद्वारे पसरवल्या जाणाऱ्या या विचारांना ध्वस्त केले की कामगार राज्यकारभार चालवू शकत नाहीत. पॅरिसच्या बहादूर कामगारांनी फक्त भांडवली सत्तेच्या रथालाच उलटवले नाही तर 72 दिवसांच्या शासनाच्या दरम्यान येणाऱ्या दिवसांचे एक छोटे मॉडेल जगासमोर प्रस्तुत केले आणि दाखवले की समाजवादी समाजामध्ये भेदभाव, असमानता, आणि शोषण कशाप्रकारे समाप्त केले जाईल. पुढे चालून 1917 च्या रशियन कामगार क्रांतीने या क्रांतीचा पुढचा टप्पा रचला.


कामगार वर्गाच्या या साहसी कारवाईने फक्त फ्रांसमधीलच नाही तर जगातील भांडवलदारांचे काळीज थरथरले. त्यांनी कामगारांच्या पहिल्या सत्तेला सुरूंग लावण्यासाठी जीवतोड प्रयत्न केले आणि शेवटी कामगारांच्या कम्युनला त्यांनी रक्ताच्या नद्यांमध्ये न्हाऊन काढले. पण कम्युनचे सिद्धांत अमर झाले.

पॅरिस कम्युनच्या पराजयातूनसुद्धा जगातील कामगार वर्गाने महत्वाचे धडे घेतले. पॅरिसच्या कामगारांचे बलिदान कामगार वर्गाला सतत आठवण देत राहील की भांडवलशाहीला नष्ट केल्याशिवाय त्यांना मुक्ती मिळू शकत नाही.

पॅरिस कम्युनला 150 वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने 'कामगार बिगुल' च्या या अंकापासून आम्ही जगातील पहिल्या कामगार राज्याच्या सचित्र कथेची सुरूवात करत आहोत. 'मजदूर बिगुल' मध्ये मार्च 2012 पासून प्रकाशित झालेल्या धारावाहिक कथेचा अनुवाद पुढील अंकांमध्ये आम्ही देत राहू. — संपादक मंडळ


## भांडवलाच्या पाशवी जुलमी सत्तेविरोधात कामगार लढायला शिकले

**1. अठराव्या शतकाच्या शेवटापर्यं**त युरोपातील भांडवलदार वर्गाचा जबरदस्त विकास झालेला होता. लुटीसाठी चाललेल्या वसाहतिक युद्धांमधून आणि कामगारांच्या भयानक शोषणातून ते अमर्याद संपत्ती गोळा करत चालले होते. दुसरीकडे, कामगारांची अवस्था अत्यंत खराब होती आणि त्यांना जीवनात पदोपदी अमानवी अडचणींचा सामना करावा लागत होता. त्या काळापर्यंत कामगारांची संख्या बरीच वाढलेली होती पण त्यांना राजकीय संघर्षांचा कोणताही अनुभव नव्हता आणि ते असंघटित होते. आपल्या स्थितीची जाणीव आणि ऐतिहासिक भुमिकेबद्दलची जाणीवही त्यांच्यामध्ये फारच कमी होती. कामगारांच्या असहाय स्थितीचा आणि स्वस्त श्रमशक्तीच्या उपलब्धतेचा फायदा घेऊन कारखानदार त्यांना पिळवटून काढत होते. कामगारांना रोज सोळा ते अठरा तास काम करावे लागे आणि स्त्रिया तसेच लहान मुलांना सुद्धा बरेच काम करावे लागत असे. भल्या पहाटे कामगारांना कारखान्यात जावे लागे आणि रात्री उशिराच ते बाहेर पडू शकत. अनेक महिने तर त्यांना प्रकाशाचे दर्शनही होत नव्हते. घाणेरड्या आणि प्रदुषणकारी जागी न हलता एकाच स्थितीत तासन-तास काम केल्यामुळे ते अनेक आजारांनी ग्रस्त होत आणि अपघातांमध्ये मरणे किंवा अपंगत्व अगदी सामान्य बाब झालेली होती. अठराव्या शतकाच्या शेवटी इंग्लंडमध्ये कामगारांच्या एकूण मृत्यूपैकी 40 टक्के टी.बी. मुळे होत होते. जवळपास याच वेळी फ्रांसमध्ये कामगारांचे सरासरी आयुर्मान फक्त 35 वर्षांवर आलेले होते. कंबरतोड मेहनत, नरकासारख्या स्थितीत राहणे, सतत अर्धपोटी राहणे, आणि गरिबीच्या अवस्थेने कामगार वर्गाच्या भौतिक आणि आत्मिक विनाशाचा धोका निर्माण केला होता.



एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीला इंग्लंडमधील एक कारखाना

कापड गिरण्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांची मोठी संख्या अधू होत जाई कारण अंदाधुंद वेगाने चालणाऱ्या मशिनी त्यांच्याकडून गुलामासारखे काम करवत. 'इंग्लंडमधील कामगार वर्गाची दशा' या आपल्या प्रसिद्ध पुस्तकात फ्रेडरिक एंगल्स लिहितात की कपडा उद्योगाच्या सर्वात मोठ्या शहरात, मँचेस्टर मध्ये, सडकेवर थोडे चालले तरी किमान 3-4 लोक असे मिळत ज्यांचे कोणते ना कोणते अंग तुटलेले असे! दमटपणा, उष्णता आणि दुर्गंधाने भरलेल्या कारखान्यांमध्ये 14-16 तास सतत काम करत राहिल्याने कामगार कमी वयातच मृत्यूमुखी पडत. एंगल्स लिहितात, "ज्या स्थितींमध्ये कामगार राहतात आणि काम करतात त्यामुळे लवकरच त्यांचे शरीर ठिसूळ बनते. त्यांच्यापैकी अनेकजण वय 40 होईपर्यंत निकामी होऊन जातात, काही 45 वयापर्यंत काम करत राहतात, पण 50 वयापर्यंत कोणीच टिकत नाही. अनेक जण तर शरीर कमजोर झाल्यामुळे निकामी बनत तर अनेक कामगार यामुळे कामावरून काढले जात कारण की सुताच्या टकळ्यांच्या बारीक धाग्यांवर कमी प्रकाशात सतत नजर खिळवून ठेवल्यामुळे त्यांना अंधत्व येई." एंगल्सने हे पुस्तक 1844 ला लिहिले जेव्हा अनेक संघर्षांनंतर कामगारांच्या स्थितीमध्ये थोडा सुधार झाला होता. यावरुनच अंदाज लावता येईल की एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला त्यांची स्थिती कशी असेल.



एका मिलमध्ये मशिनवर काम करणारी मुलं. मुलांकडून हर तऱ्हेचे काम करवले जायचे आणि 12-14 तास कामाच्या बदल्यात त्यांना पुरुषांच्या निम्म्यापेक्षा कमी मजुरी मिळायची.



लंडनच्या एका रस्त्यावर रात्र काढणारे बेघर मजूर

इंग्लंड मध्ये एका कारखान्यात मशीन नष्ट करणारे मजूर



**2. शेवटी**, स्वत:ला वाचवण्याच्या सहजबोधातून कामगारांनी आपल्या मालकांविरोधात लढणे चालू केले. पण एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीला कामगारांमध्ये ही चेतना नव्हती की त्यांच्या त्रासाला आणि संकटांना कोण जबाबदार आहे. अगोदर त्यांना असेच वाटले की मशिनींमुळे त्यांची अवस्था इतकी असह्य झाली आहे. इंग्लंडच्या मोठ्या औद्योगिक शहरांमध्ये—नॉटींघम, यॉर्कशायर, आणि लँकशायर मध्ये—1811मध्ये कामगारांनी मशीन नष्ट करण्याचे सुनियोजित अभियान चालू केले. या लोकांचा म्होरक्या 'जनरल लुड्ड' नावाचे एक काल्पनिक पात्र होते. असे म्हणतात की त्याचे नाव नेड लुड्ड या कामगाराच्या नावावरून पडले होते, ज्याने या आंदोलनाची सुरूवात केली होती. कामगारांच्या तुकड्या कारखाना मालकांच्या विरोधात हिंसक कारवाया करत, कारखान्यांना आग लावत, आणि मशिनींचे छोटे-छोटे तुकडे करत. पोलिस त्यांना थांबवण्यात अपयशी ठरले तेव्हा कारखाना मालकांच्या मागणीवरून सैन्याला पाचारण केले गेले. त्यांना चिरडण्यासाठी संसदेने कडक कायदे बनवले ज्यानुसार 17 कामगारांना फाशी दिली गेली आणि अनेकांना हजारो मैल दूर, ऑस्ट्रेलियाला पाठवले गेले. हळूहळू कामगारांना समजले की त्यांच्या समस्यांचे कारण मशीन नाहीत आणि मशीन नष्ट करून त्यांचे जीवन चांगले होणार नाही. असे असले तरी बराच काळ मशिनींवर आपला राग काढण्याचे सत्र तुरळकपणे चालूच राहिले. कार्ल मार्क्सने लिहिल्याप्रमाणे: "बराच काळ बेतल्यानंतर आणि बराच अनुभव आल्यानंतर कामगार मशीन आणि भांडवलाद्वारे मशिनीच्या उपयोगात फरक करू शकले आणि नंतर त्यांनी आपल्या प्रहाराच्या निशाण्यावर उत्पादनाच्या भौतिक अवजारांऐवजी त्या विशिष्ट सामाजिक व्यवस्थेला बनवणे शिकले जी या अवजारांचा वापर करते."



एका कापूस कातण्याच्या मिल मध्ये काम करणाऱ्या स्त्री कामगार

# पॅरिस कम्युन: पहिल्या मजूर राज्याची सचित्र कथा (पुष्प पहिले)

**3. युरोपातील** दुसरा मोठा औद्योगिक देश असलेल्या फ्रांस मध्ये सुद्धा कामगारांची अवस्था इंग्लंडमधील कामगारांसारखीच असह्य होती. फ्रांसमधील दुसरे मोठे शहर लिआँ हे रेशीम उद्योगाचे केंद्र होते. नोव्हेंबर 1831 मध्ये आपल्या भयंकर गरिबीने त्रस्त मजुरांनी मजुरीच्या दराच्या प्रश्नावर विद्रोह केला. हजारो कामगारांनी सैन्याच्या शस्त्रागारावर हल्ला चढवून हत्यारं लुटली आणि सैनिकी तुकड्यांना पळवून शहर ताब्यात घेतले. त्यांनी काळे बॅनर घेऊन मोर्चा काढला, ज्यावर लिहिले होते, "आम्ही जगण्याच्या आणि काम करण्याच्या अधिकारासाठी लढत-लढत मरायला तयार आहोत!". राजधानी पॅरिसवरून पाठवलेल्या 20,000 सैन्याने या विद्रोहाला निर्दयपणे चिरडले. पण बंडाची आग मात्र आत धगधगतच राहिली. कामगारांनी आपल्या गुप्त सोसायट्या (गट) बनवण्याचे सत्र सुरू केले, ज्यांमध्ये कामगार आपल्या अवस्थेबद्दल आणि तिला बदलण्यासाठी संघर्षाबद्दल चर्चा करत. फक्त तीन वर्षांनंतर, 1834 मध्ये, लिआँच्या विणकरांनी पुन्हा एकदा विद्रोह केला. फेब्रुवारी 1834 मध्ये, कारखाना मालकांनी हे म्हणत मजुरी घटवण्याचे प्रयत्न सुरू केले की आता मजूर पूर्वीपेक्षा खूप जास्त कमावत आहेत आणि त्यामुळे उद्योगांच्या वाढीला अटकाव होत आहे.



**1831 मध्ये लिआँ येथील रेशीम विणकर कामगारांचा विद्रोह. कामगारांनी शहरावर कब्जा केला आणि त्यांना चिरडण्यासाठी सैन्य बोलवावे लागले.**



**1834 मध्ये लिआँ येथे कामगारांचे दुसरे बंड चिरडण्यासाठी सैन्याने कामगारांचे हत्याकांड घडवले.**

याच्या उत्तरात, एप्रिल 1834 मध्ये कामगार पुन्हा सडकेवर उतरले. त्यांचे दमन करण्याचा प्रयत्न केला गेला तेव्हा त्यांनी शस्त्रागारावर हल्ला करत हत्यारं लुटली आणि सैन्याला शहर सोडून जाण्यासाठी मजबूर केले. यावेळी कामगार अधिक संघटित होते आणि त्यांच्या मागण्यांमध्ये कामाच्या चांगल्या स्थितीसोबतच राजेशाही संपवून गणतंत्राची स्थापना करण्याची मागणीही सामील होती. फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळी स्थापित झालेल्या राष्ट्रीय गार्डच्या (सैनिकी) तुकड्यांनी सुद्धा कामगारांना साथ दिली. संपूर्ण शहरावर विद्रोहींचा कब्जा स्थापित झाला. पॅरिस मधून पाठवलेल्या सैन्यासोबत मजुरांची एक आठवडाभर लडाई चालूच राहिली. तोफांच्या भडिमाराने आणि शेकडो मजुरांच्या हत्याकांडासहीत शेवटी या विद्रोहाला सुद्धा चिरडले गेले. 10,000 पेक्षा जास्त कामगारांना कैद करून पॅरिसला नेण्यात आले, जिथे त्यांच्यावर खटला चालवून त्यांना अनेक वर्षे तुरुंगाची अथवा देशातून निष्कासित करण्याची शिक्षा दिली गेली. या विद्रोहाने हे दाखवले की कामगार किती वेगाने राजकीय दृष्ट्या जागरूक होत होते.

**4. सुरुवातीच्या काळात** जेव्हा कामगारांनी आपल्या मागण्यांसाठी संप करणे चालू केले तेव्हा त्यांच्याकडे अशी कोणतीही संघटना नव्हती जी संपादरम्यान निर्माण होणाऱ्या एकजुटतेला कायम ठेवेल. कामगार वर्गाच्या सर्व संस्था आणि युनियन बेकायदेशीर मानल्या जात आणि यामुळे कामगारांनी गुप्त सोसायट्या बनवणे चालू केले. हळूहळू त्यांची संख्या आणि सक्रियता वाढत गेली. कामगारांच्या संघर्षामुळे शेवटी इंग्लंडच्या सरकारला 1824 मध्ये त्या कायद्यांना रद्द करावे लागले जे संघटना बनवण्यास प्रतिबंध करत होते. यानंतर लवकरच उद्योगाच्या प्रत्येक शाखेमध्ये ट्रेड-युनियन्स बनल्या ज्या भांडवलदार वर्गाच्या अत्याचार आणि अन्यायापासून कामगारांना वाचवण्याचा प्रयत्न करू लागल्या. त्यांचे उद्दिष्ट होते: सामुहिक कराराने मजुरी ठरवणे, मजुरीमध्ये शक्य तेवढी वाढ करवणे, कारखान्यांच्या प्रत्येक शाखेमध्ये मजुरीचा समान स्तर स्थापित करणे. अशा अनेक युनियन्सनी मिळून राष्ट्रीय स्तरावर कामगारांना एकजूट करण्याचा प्रयत्न करणे सुरू केले. युनियन्सच्या संघर्षाचे मार्ग होते—संप, संप तोडणाऱ्या मजुरांचा सामना करणे, आणि युनियन बाहेरील कामगारांना सामील होण्यासाठी मनवणे. युनियन्सच्या कारवायांनी कामगारांची चेतना आणि संघटितपणा वेगाने वाढू लागला.



**इंग्लंडमध्ये शेतमजुरांची एक युनियन बनवल्यावर त्यांच्या 6 नेत्यांना जेम्स लवलेस, जॉन स्टँडफील्ड, जेम्स ब्रायन, जेम्स हॅमेट, जॉर्ज लवलेस, थॉमस स्टँडफील्ड यांना 1834 मध्ये कडक शिक्षा सुनावली गेली ज्याला देशभरात मोठा विरोध झाला. 8 लाख लोकांच्या सह्या घेऊन राजधानी लंडन मध्ये एक मोठा मोर्चा काढला गेला.**

**5. संपांची घोषणा,** ट्रेड युनियन्सची स्थापना, युनियन्सचे क्षेत्रीय संघटनांमध्ये आणि नंतर राष्ट्रीय संघटनांमध्ये एकत्र येणे, आणि त्यानंतर अनेक युनियन्सनी मिळून तात्पुरत्या संघटना बनवण्याचे काम कष्टकऱ्यांच्या राजकीय संघर्षासोबत सतत चालू राहिले आणि याने 1836-37 च्या आर्थिक संकटानंतर गंभीर हालचालींचे रूप धारण केले. 1837 मध्ये कामगारांच्या नेत्यांनी एक मागणीपत्रक—चार्टर—तयार केला ज्याद्वारे संसदेसमोर मागण्या मांडल्या गेल्या. यानंतर त्यांनी या मागणीपत्रकावर स्वाक्षऱ्या घेणे चालू केले. तीन वेळा, 1839, 1842 आणि 1848 मध्ये, हे मागणीपत्रक संसदेला दिले गेले आणि प्रत्येक वेळी त्यावर मागच्या वेळेपेक्षा जास्त स्वाक्षऱ्या होत्या. पहिल्यांदा 12 लाख स्वाक्षऱ्या जुळवल्या गेल्या, दुसऱ्यांदा 33 लाख आणि तिसऱ्यांदा जवळपास 50 लाख. या मागण्यांच्या समर्थनात आंदोलन करण्यासाठी नॅशनल चार्टिस्ट असोसिएशनची स्थापना केली गेली. या संघटनेचे उद्दिष्ट कारागीर आणि कष्टकरी वर्गाच्या मागण्या उचलणे होते आणि हिला कामगारांचा पहिला राजकीय पक्ष म्हटले जाऊ शकते.



**चार्टिस्ट आंदोलनाच्या दरम्यान कामगारांच्या एका सभेत बोलताना कामगारांचे नेते फिअरगेस ओ'कॉनर.**

स्वाक्षऱ्या घेणे आणि मागणीपत्रकाशी जोडलेल्या राजकीय आणि सामाजिक प्रश्नांवर चालणाऱ्या वाद-चर्चांमुळे कामगार आंदोलनाचा जबरदस्त राजकीय विकास झाला. कामगार आणि त्यांची कुटुंबं संध्याकाळी मशालींच्या उजेडात एकत्र होऊन राजकीय भाषण ऐकत असत आणि परिस्थितीवर चर्चा करत. रात्रीच्या वेळी ब्रिटनमधील शहरांच्या सडकांवर चार्टिस्टांचे भव्य मोर्चे निघत. कामगारांनी पहिल्यांदा अनुभव घेतला की ते जेव्हा मिळून आणि संघटित पद्धतीने काही करतात तेव्हा त्यांची शक्ती किती जबरदस्त बनते. जसजसे चार्टिस्ट आंदोलन पुढे गेले, कामगार आपल्या यश-अपयशांपासून धडे घेत आसपासच्या दुनियेची जास्त चांगली समजदारी मिळवत गेले आणि बऱ्याचशा भ्रमांपासून मुक्तही होत गेले. पण चार्टिस्ट नेते अजूनही कामगार वर्गाच्या भूमिकेला आणि संघटित होण्याच्या गरजेला योग्यरित्या समजू शकत नव्हते. चार्टिस्ट आंदोलन आपल्या प्रभावाचा पूर्ण उपयोग करण्यात अपयशी राहिले आणि 1848 नंतर उतरणीला लागले. पण हे इतिहासामध्ये सर्वहारा वर्गाचे पहिले व्यापक राजकीय आंदोलन होते आणि ते एक प्रेरणादायी उदाहरण बनले. चार्टिस्ट आंदोलनानंतर कामगार वर्गाच्या मुक्ती-संघर्षाने एका नवीन आणि अधिक उन्नत पातळीवर प्रवेश केला.



**लंडनमध्ये कामगारांच्या मागणीपत्रकावर लाखो स्वाक्षऱ्या घेऊन संसदेकडे जाणाऱ्या कामगारांचा भव्य मोर्चा. ज्या मोठ्या पेटीमध्ये स्वाक्षऱ्या आहेत तिला वीस लोकांनी खांद्यावर घेतले आहे**

**(क्रमश:)**

# 8 मार्च, आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने क्लारा झेटकीन यांच्या व्ला.ई. लेनिन सोबतच्या चर्चेचा एक अंश

## सामान्य लोकांमधील पुरुषसत्तावादी विचार आणि कष्टकरी महिलांच्या घरेलू गुलामीच्या संघर्षाबद्दल कम्युनिस्ट दृष्टिकोण

✍ अनुवाद: अभिजित

जगातील पहिल्या समाजवादी क्रांतीचे महान नेते लेनिन यांनी जर्मन कम्युनिस्ट पक्षाच्या आणि आंतरराष्ट्रीय स्त्री आंदोलनाच्या नेत्या क्लारा झेटकीन यांच्या सोबत ही चर्चा 1920 मध्ये मॉस्को मध्ये केली. या चर्चेमध्ये लेनिन यांनी स्त्रियांच्या घरेलू गुलामीबद्दल आणि पुरुषांच्या पुरुषसत्तावादी मानसिकतेबद्दल तीव्र घृणा दर्शवली आहे. त्यांचे म्हणणे आहे की कामगार वर्गामध्ये सुद्धा या गोष्टी खोलवर रुजलेल्या आहेत. कष्टकरी महिलांची घरेलू गुलामी आणि पुरुष कामगारांची "जुन्या दास स्वामींसारखी" मानसिकता यांच्याशी लढल्याशिवाय कामगार वर्गीय क्रांती थोडीही पुढे जाऊ शकत नाही. कष्टकरी महिलांच्या अर्ध्या लोकसंख्येला संघटित केल्याशिवाय कामगार वर्ग आपल्या मुक्तीच्या लढ्याला अजिबात पुढे नेऊ शकत नाही. लेनिन त्या कम्युनिस्टांवर तीव्र टीका करतात जे आतून रूढीवादी असतात आणि पुरुषसत्तावादी संस्कारांपासून मुक्त नसतात. ते स्त्री कामगारांना जागृत आणि संघटित करण्याच्या कामावर पुरेसा जोर न देण्याच्या प्रवृत्तीची सुद्धा तीव्र टीका करतात.

आजपासून 104 वर्षे अगोदर 1917 मध्ये कामगार वर्गाने रशियामध्ये समाजवादी क्रांती संपन्न केली. कामगार सत्तेने स्त्रियांना जगाच्या इतर कोणत्याही भांडवली लोकशाही गणतंत्राच्या तुलनेत अनेक पटीने अधिक समानतेची संधी आणि अधिकार दिले. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात सक्रियतेची संधी देण्यासोबतच घरेलू गुलामीपासून सुटका मिळवून देण्यासाठी नवनवीन सामाजिक संस्था उभ्या केल्या. तरीही लेनिनचे मानणे होते की स्त्रियांच्या खऱ्या मुक्तीसाठी समाजवादाच्या संपूर्ण कालावधीत पुरुषसत्तावाद आणि भांडवली अवशेषांविरोधात सतत दीर्घ संघर्ष चालवावा लागेल.

---

- "...तत्वांच्या स्पष्ट समजदारीसह, आणि एका मजबूत सांघटनिक आधारावर स्त्री समुदायाला संघटित करणे कम्युनिस्ट पक्षांसाठी आणि त्यांच्या विजयासाठी एक महत्वपूर्ण प्रश्न आहे. पण आपण स्वत:ला फसवले नाही पाहिजे. आपल्या राष्ट्रीय गटांमध्ये (म्हणजे कम्युनिस्ट इंटरनॅशनलचे अंग म्हणून विविध देशांमधील कम्युनिस्ट पार्ट्यांमध्ये-अनुवादक) अजूनही या प्रश्नावर योग्य समजदारीचा अभाव आहे. जेव्हा कम्युनिस्ट नेतृत्वामध्ये कष्टकरी स्त्रियांचे जनांदोलन उभे करण्याचा मुद्दा येतो तेव्हा ते एक निष्क्रिय आणि 'वाट बघत रहा' सारखा दृष्टिकोण अंगिकारतात. त्यांना या गोष्टीची जाणीव होत नाही की अशा जनांदोलनांना विकसित करणे आणि नेतृत्व देणे सर्व पार्टी कार्याचा एक महत्त्वपूर्ण हिस्सा आहे, इतकेच नाही तर पार्टी कार्याचा अर्धा हिस्सा आहे. एका स्पष्ट दिशेने जाणाऱ्या, शक्तिशाली आणि व्यापक कम्युनिस्ट स्त्री आंदोलनाची गरज आणि मोल तर ते वेळोवेळी स्विकारतात, परंतु पार्टीच्या सततच्या चिंतेच्या आणि कार्यभाराच्या रुपाने त्याची स्विकृती होण्याऐवजी तो फक्त तोंडी जमाखर्चच असतो."

"स्त्रियांमध्ये उद्बोधन आणि प्रचाराच्या कामांना, त्यांना जागृत आणि क्रांतिकारी बनवण्याच्या कामाला ते दुसऱ्या प्राथमिकतेवर ठेवतात आणि याला फक्त स्त्री कम्युनिस्टांचे काम समजतात. जर हे काम वेगाने आणि मजबुतीने पुढे गेले नाही तर त्यासाठी त्यांनाच (म्हणजे स्त्री कम्युनिस्टांनाच–अनुवादक) दोष देतात. हे चुकीचे आहे, तत्वत: चुकीचे आहे. एकदम चुकीचे आहे. महिलांच्या समानतेला नाकारण्यासारखीच ही बाब आहे."

"आपल्या राष्ट्रीय गटांच्या (वेगवेगळ्या देशांमधील कम्युनिस्ट पक्ष-अनुवादक) या चुकीच्या दृष्टीकोणाच्या मूळात काय आहे? (मी इथे सोवियत रशियाबद्दल बोलत नाहीये.) अंतिम विश्लेषणामध्ये, हे स्त्रियांना आणि त्यांच्या कतृत्वाला कमी करून मोजणे आहे. हो, असंच आहे. दुर्दैवाने, आपल्या बहुतेक कॉम्रेड्स बद्दल आपण अजूनही म्हणू शकतो: 'कम्युनिस्टाला ओरखडून पहा, एक बुद्धिविरोधी व्यक्ती समोर येईल.' या गोष्टींची खात्री करण्यासाठी तुम्हाला संवेदनशील मुद्यांवर—जसे की स्त्रियांसंबंधात त्यांच्या मानसिकतेला—ओरखडून पहावे लागेल. याचा यापेक्षा जास्त मोठा पुरावा काय असू शकतो की एक पुरुष, शांततेने, एका महिलेला तिच्या घरेलू कामासारख्या किरकोळ, एकसुरी कामामध्ये खपताना बघत राहतो आणि तिच्या आत्म्याला संकुचित होताना, तिच्या मेंदूला कुंद होताना, तिच्या हृद्याचे ठोके मंद होताना आणि तिच्या आकांक्षांना कमजोर होताना बघत राहतो? नक्कीच मी त्या भांडवली (बुर्ज्वा) महिलांबद्दल बोलत नाहीये ज्या आपल्या सर्व घरेलू कामाच्या आणि आपल्या मुलांच्या देखभालीच्या जबाबदाऱ्या नोकरांवर सोपवतात. मी जे म्हणत आहे ते स्त्रियांच्या विशाल बहुसंख्येला लागू होते ज्यामध्ये कामगारांच्या पत्नी सुद्धा सामील आहेत आणि त्या स्त्रियाही सामील आहेत ज्या दिवसभर कारखान्यात खटतात आणि पैसे कमावतात."

"खूपच थोडे पती, सर्वहारा वर्गाचे पतीसुद्धा यात सामील आहेत, जे विचार करतात की जर त्यांनी या 'महिलांच्या कामात' हातभार लावला, तर ते त्यांच्या पत्नींवरचे ओझे आणि चिंता किती कमी करू शकतात, किंवा ते त्यांना पूर्णत: भारमुक्त करू शकतात. पण नाही, हे तर 'पतीच्या विशेषाधिकारांच्या आणि प्रतिष्ठेच्या' विरोधात जाईल. त्याची मागणी आहे की त्याला आराम आणि निवांतपणा पाहिजे. महिलेच्या घरेलू जीवनाचा अर्थ आहे एक हजार किरकोळ कामांमध्ये आपल्या 'स्व'चे सतत बलिदान देत राहणे. तिच्या पतीचे, तिच्या मालकाचे, परंपरागत अधिकार टिकून राहतात, आणि त्यांच्यावर लक्षही जात नाही. वस्तुगतरित्या, त्याची दासी बदला घेत असते, छुप्या रुपात सुद्धा. तिचे मागासलेपण आणि आपल्या पतीच्या क्रांतिकारी आदर्शांच्या समजदारीचा अभाव पुरुषाच्या झुंझार भावनेला आणि संघर्षाप्रती दृढनिश्चयाला मागे ओढण्याचेच काम करतात. या गोष्टी वाळवीसारख्या, अदृश्य रुपाने, हळूहळू पण निश्चितपणे आपले काम करत

पान 11 वर

# वितरण (डिलिव्हरी) क्षेत्रातील कामगार वर्गाने संघटित होण्याची गरज अधोरेखित

पान 12 वरून

प्रयत्न झाला, परंतु उद्योगपतींची दलाली करत मोठ्या झालेल्या अशा कोणत्याही पक्षाकडून अपेक्षा ठेवणे हेच चूक आहे हा अनुभव पुन्हा एकदा कामगारांना आला. तुम्ही नाही तर दुसरे काम घ्यायला तयार बसलेच आहेत ही धमकी कंपनीने कामगारांपर्यंत तर पोहोचती केलीच. **नाईलाजाने कामगारांनी आंदोलन बंद केले आहे. अनेक जण कामावर पुन्हा रुजू झाले आहेत, तर काहीजणांनी काम सोडले आहे.**

दुसऱ्या कंपन्यांकडून कामगारांना खेचण्यासाठी नवनवीन कंपन्या सुरूवातीला जास्त दर देऊ करतात, परंतु धंद्यात जम बसणे चालू झाल्यावर कामगारांचे पगार खाली खेचणे चालू करतात हे विना अपवाद दिसून येते. कुठल्याही कंपनीचा नफा हा कामगारांच्या श्रमशक्तीच्या पिळवणुकीतून येतो हा भांडवली व्यवस्थेचा नियमच आहे. कामगारच सर्व संपत्ती निर्माण करतात आणि ऐतखाऊ मालक नफ्याच्या रुपाने तिला हस्तगत करतात. कामगारांना उपाशी ठेवून काम करवण्याची तयारी असलेली त्याची मेझॉन कंपनीही अपवाद का असेल? **जगातील सर्वाधिक श्रीमंत लोकांपैकी एक असलेला, 8 ते 10 लाख कोटींची संपत्ती बाळगणारा जेफ बेझोस आणि 30 लाख कोटी रुपयांवर माल विकणारी मेझॉन कंपनी सुद्धा कामगारांच्या पोटाला चिमटा घेऊनच इतक्या श्रीमंत झाल्या आहेत!**

**या आंदोलनांपासून योग्य धडे घेतले जाणे अत्यंत आवश्यक आहे.** पहिले हे की, शेतमजूर असोत, बांधकाम कामगार असोत, घरकामगार असोत, विविध क्षेत्रातील प्रवासी कामगार असोत, या सर्वांच्या स्वत:स्फूर्त आंदोलनाच्या बातम्या गेल्या काही काळात सतत येत आहेत; परंतु **संघटित नसल्यामुळे, व्यापक राजकीय कार्यदिशेच्या अभावामुळे ही आंदोलने बहुतांशी तात्कालिक उद्रेकाचे किंवा विरोधाचेच रूप घेताना दिसतात.** दुसरे हे की सर्व सरकारे फक्त मालकांच्या नफ्यासाठीच अर्थव्यवस्था चालवत आहेत, आणि त्यापायीच झालेली अर्थव्यवस्थेची दु:स्थिती, मंदीची स्थिती, नफ्याच्या घसरत्या दराचे संकट मालकांना कामगारांची अति-पिळवणूक करण्याकडे ढकलत आहे. तिसरे, आंदोलन सध्या मागे जरी झालेले असले तरी यातून **जीवनाची स्थिती सुधारणार नाहीये. आज 10 रुपयांवर आलेली मजुरी उद्या 9 किंवा 8 वर जाण्याची शक्यता कायम आहे, नव्हे, कंपनीची तशी इच्छा नक्कीच आहे, तेव्हा संघर्ष कामगारांना चुकणार नाहीच.** चौथे, व्यापकरित्या फक्त एका कंपनीतील नाही तर **या क्षेत्रातील सर्व कामगारांना संघटित करून डिलिव्हरी कामगारांची संपूर्ण एकच युनियन** स्थापन केल्याशिवाय खऱ्या अर्थाने कामगारांची वाटाघाटी करण्याची शक्ती बनणे शक्य नाही हे सुद्धा पुन्हा एकदा दिसून आले आहे.

याशिवाय, या सर्व प्रकरणांमध्ये **केंद्र आणि राज्य सरकार यांची भूमिका फक्त बघ्याची नाहीये तर मेझॉन सारख्या कंपनीच्या बाजूची आहे हे सुद्धा स्पष्ट आहे,** नाहीतर मनमानी पद्धतीने कामगारांना वेठीस धरण्याचा परवाना या कंपन्यांना कुठून मिळत आहे? केंद्र सरकारने 'गिग कामगार' आणि 'ऑनलाईन प्लॅटफॉर्म' कामगारांसाठी योजना बनवण्याचे फक्त सुतोवाच केले आहे, कार्यवाही मात्र शून्य आहे. इतकेच नाही तर जनता स्वत:स्फूर्तीने लढायला उभी राहिल्यानंतर मढ्याच्या टाळूवरचे लोणी खाणारे भांडवली राजकीय पक्ष आणि नकली लाल झेंड्यावाले दुरुस्तीवादी पक्ष चोच मारायला, मालकांच्या वतीने मध्यस्थी करायला, दलाली खायला आणि कामगारांना नेहमीप्रमाणे धोका देण्यासाठी पुढे येतातच; अशा पक्षांपासून सावध राहण्याचे काम कामगार वर्गाला सतत करावेच लागेल.

'गिग' किंवा 'प्लॅटफॉर्म' वर्कर्स म्हणवल्या जाणाऱ्या या कामगारांना कंपन्या कामगार नाही तर स्वतंत्र व्यावसायिक मानतात. **विचारधारात्मकरित्या कामगारांनी स्वत:ला कामगार समजू नये,** सुरुवातीला कंपन्यांनीच घडवून आणलेल्या अति-कमाईच्या अपवादात्मक उदाहरणांच्या आधारावर सर्वच कामगारांनी एका **स्वतंत्र व्यावसायिकाच्या रुपाने झटपट श्रीमंत होण्याची स्वप्ने रंगवावीत** आणि त्याद्वारे कामगारांची एकता घडवू न देता, कामगार विरुद्ध भांडवलदार या संघर्षात भांडवलदारांनी आपली स्वत:ची शक्ती वाढवावी हे या व्यवस्थेचे खरे राजकारण आहे. **कामगारांच्या अशा रूपाने केलेल्या 'नैमित्तिकीकरणा'तून (casualisation) कामगारांची वर्ग चेतना कुंद केली जात आहे.** याचाच फायदा घेऊन लाखो कोटी रुपयांच्या भांडवलाचे मालक कोट्यवधी कामगारांना वेठीस धरत आहेत. गेल्या 2-3 वर्षांमधील घडामोडी दिखाव्यामागचे खरे सत्य समोर आणतच आहेत. इतर प्रकारच्या कामांपेक्षा डिलिव्हरी क्षेत्रात तुलनेने थोडी जास्त कमाई होते असे अजूनही दिसते आणि म्हणूनही या कामाचे फसवे आकर्षण अनेकांना वाटते, परंतु नफ्याच्या वाढत्या दराची गरज कंपन्यांना भाग पाडतच आहे की या क्षेत्रातील कामगारांनाही इतर क्षेत्राएवढ्या सरासरी मजुरीवर आणावे. तेव्हा **डिलिव्हरी वा तत्सम कामे करणाऱ्या कामगारांनी आज सर्वप्रथम आपली खरी वर्गीय ओळख जाणणे महत्वाचे आहे.**

शेवटी सर्वसामान्य कामगार कष्टकरी नागरिकांनी हे समजले पाहिजे की आज कुठल्याही कामाच्या ठिकाणी कामगार-कर्मचाऱ्यांची हीच दयनीय अवस्था प्रत्येक कंपनी करत आहे; याचे पहिले कारण आहे की सत्तेवर याच कंपन्यांचा—भांडवलदार वर्गाचा—ताबा आहे आणि आज आर्थिक संकटाच्या काळात नफ्याचा दर टिकवण्यासाठी कामगारांचे आत्यंतिक शोषण अपरिहार्य बनले आहे. मुठभरांच्या ताब्यात जिथे सर्व उत्पादनाची साधने आहेत, आणि बहुसंख्यांकांना कामगार म्हणूनच जीवन जगण्याची सक्ती आहे अशा भांडवली व्यवस्थेची हीच परिणती आहे. आज वितरण (डिलिव्हरी) कामगारांनी रोजगाराचा मुलभूत अधिकार, कायम काम, पेन्शन पासून ते आरोग्य सुविधा आणि शिक्षणासाठी क्रांतिकारी चळवळींसोबत स्वत:ला जोडणे आवश्यक झाले आहे.

# तुमच्या सदाचाराचा ऱ्हास

✍राहुल सांकृत्यायन

## मद्यपान

जगातील अनेक मुख्य धर्म दारूला निषिद्ध मानतात. इस्लाम सुद्धा तिला अगदी कट्टर शत्रू मानतो. दारू पिणे मोठा दुराचार मानला जातो. पण धनिकांमध्ये गेल्या तेराशे वर्षांमध्ये किती जणांनी या नियमावर अंमल केला आहे? अनेक ठिकाणी तर दारूच्या दुकानांचे मालकच मुसलमान आहेत. ज्या काळात मुसलमानी सत्तांनी दारू विरोधात कडक शिक्षा ठरवून दिल्या होत्या, त्या काळातही धनिक लोकांना दारू पिण्यात काही अडत नव्हते. हिंदूंमध्ये सुद्धा अनेक संप्रदाय दारू पिण्याला महापाप समजतात. पण किती जाती आहेत ज्यांच्यामधील धनिक दारूपासून दूर आहेत? ब्राह्मण, मारवाडी, राजपूत, ज्या कोणाकडे खर्च करायला भरपूर पैसा आहे, तो विनासंकोच पितो; आणि जातवाले टूक-टूक पहात राहतात. दारूमागे लाठी घेऊन फिरणाऱ्या महात्माजींच्या अनुयायांमध्ये सुद्धा किती मोठ-मोठे महापुरूष आहेत जे आतून तर आपल्या गुरुशी मतभेद ठेवतात, पण दारूबंदीची व्यवस्था लागू करण्यात ते कोणापेक्षाही मागे राहणार नाहीत.

## असत्य

सत्य बोलण्यावर धर्म आणि समाज जोर देत आहेत; आणि मी मानतो की, जर समाजात कृत्रिमता नसेल तर ते तितके अवघड नाही! तेव्हा सत्य बोलणे सुद्धा आजकाल किती अवघड काम आहे, हे सांगण्याची गरज नाही. या मुश्किलीचे उत्तरदायित्व शेवटी आपल्या समाजाच्या सध्याच्या संरचनेवरच आहे, जिच्यात खरे बोलणाऱ्यांसाठी स्थानच नाही. आपल्या राजकीय संस्था तर खोटारडेपणाच्या प्रचाराचे सर्वात मोठे अड्डे आहेत. खोटे बोलले जाते ते लोकांना फसवण्यासाठी. आपल्या स्वार्थासाठी खोटे बोलून दुसऱ्यांना धोका देणे हे प्रत्येक राष्ट्र आणि राजकारणी आपले परम कर्तव्य समजतो. राजकीय शब्दकोषात जणू खोटे बोलणे हे पाप समजलेच जात नाही. आपल्या धर्मात आणि समाजात सत्य बोलण्यावर एवढा जोर बिनकामाचा आहे, कारण दुसरीकडे तेच व्यक्तींना खोटे बोलण्यास भाग पाडतात. शाळेत एखाद्या मुलाने शाईची दौत तोडली. जर त्याने तोडल्याचे स्विकारले तर त्याला शिक्षा आणि भर्त्सनेला तोंड द्यावे लागेल आणि खोटे बोलले तर तो सरळ सुटून जाईल. हाणामारी आणि इतर अपराधांमध्ये सुद्धा खोटे बोलणारेच नफ्यात राहतात, मग कोण खरे बोलून शिक्षा भोगायला तयार होईल? प्रामाणिकपणे काम करून पोट भरणे सुद्धा आजकाल मुश्किल आहे. खरे बोलून लोकांशी मैत्री करणे सुद्धा अशक्य आहे. यामुळेच तर माणसाला खोटं बोलणे भाग पडते. आजकाल तर मोठ-मोठी संपत्ती, मोठ-मोठे पद, मोठ-मोठे सन्मान हे खोटं बोलण्याच्या कौशल्यासाठी पारितोषिकं आहेत; बोलायचा सदाचार एक आहे आणि वागायचा दुसरा. जोपर्यंत संपूर्ण समाजाच्या बाबतीतच हे खरे आहे, तोपर्यंत एक क्षुल्लक व्यक्ती स्वत:ला



व्यक्ती आपल्या विचारांना स्वतंत्ररित्या प्रकट करण्यात असमर्थ बनला आहे. समाजातील प्रत्येक व्यक्ती स्वत:साठी तर अशी इच्छा करत नाही, पण इतरांना धोका देऊन आपला कार्यभार मात्र साधू पाहतो. कोणाचा कोणावर पूर्णत: विश्वास नाही, याचा परिणाम होत आहे—स्त्री पुरुषाला सोडू पाहते आणि पुरुष स्त्रीला; बाप मुलाला धोका देऊ पाहतो आणि मुलगा बापाला. शेवटी या प्रकारच्या वंचना, अराजकतेला जबाबदार कोण आहे? आपला समाज. त्यापासून कसे वाचवू शकतो. अनेक जंगली जमाती आहेत ज्या भांडवली सभ्यता आणि संस्कृतीच्या तुलनेत खालच्या मानल्या जातात, पण त्यांच्यामध्ये असत्य फार कमी दिसून येते. याचाच अर्थ आहे की ही सभ्यता आणि संस्कृती उन्नत होऊन आपल्या समाजाला सत्यासंदर्भात तर अजून खालीच घेऊन जाते. आपल्या समाजाने ढोंग आणि आत्मवंचनेला जितका अधिक आश्रय दिला आहे तितकाच प्रत्येक

## चोरी-लाचखोरी

जुन्या काळात चोरी करणाऱ्याचे हात छाटले जात असत, जीवही घेतला जाई. आजकाल शिक्षा थोड्या हलक्या झाल्या आहेत, पण समाजाच्या नजरेत मात्र चोरी हे मोठे पाप समजले जाते. चोरीकरिता कडक कायदे आणि मोठमोठे तुरूंग बनले आहेत. सरकार लाखो रुपये पोलिसांवर खर्च करत आहे. मोठ-मोठे पगार घेणारे जज्ज आणि मॅजिस्ट्रेट यासाठीच नेमले आहेत. पण यामुळे काही पायबंद बसला का? ज्या लोकांना चोरी बंद करवण्याचे काम मिळाले आहे, तेच जर स्वत:च चोरी करत असतील, तर चोरी बंद कशी होणार? पोलिस चोरांना पकडण्यासाठी आणि चोरी थांबवण्यासाठी स्वत:ला जबाबदार समजतात, पण चौकीदार आणि कॉंस्टेबलच नाही तर ठाणेदार, इन्सपेक्टर आणि वरचे अधिकारी सुद्धा हात गरम झाले की नरम होतात. सर्व लोक जाणतात की शंभरातले नव्वद ठाणेदार लाच घेतात, गावांकडे तर कोणापासून हे लपले आहे? पोलिस काही चोरांना पकडून तुरुंगात तर धाडतात, पण कधी कोणी हिशोब लावला आहे का, की किती खऱ्या गुन्हेगारांना त्यांनी पैसे घेऊन सोडले आहे? जनतेचे सरकार स्थापित झाल्यानंतरही आपण पोलिसांच्या या प्रवृत्तीमध्ये काही फरक पाहू शकत नाही. जोपर्यंत असा लाचखोरीचा बाजार चालू आहे, तोपर्यंत चोरी कशी थांबणार? विचार करा की ज्या लोकांना आपल्या कुटुंबाच्या गुजाऱ्यासाठी दरमहिना भरपूर पैसे मिळतात, ते सुद्धा जर अवैध उत्पन्नापासून दूर राहू शकत नाहीत, तर भूकेने बेजार होऊन चोरी करणारे स्वत:ला कसे थांबवू शकतील?

तुरुंगामध्ये अपराध्याला सुधारण्यासाठी पाठवले जाते. कोण्या काळी शिक्षेचा अर्थ होता गुन्हेगाराला यंत्रणेची जरब बसवणे, पण आजच्या सभ्यतेत तुरुंग आणि शिक्षेला सुधार करण्याची संधी म्हणून पाहिले जाते. या तुरुंगांची अवस्था काय आहे? कैदी तिथे जाऊन पहातो की छोट्या शिपायापासून सुपरिंटेंडंट पर्यंत सर्वजण कैद्यांच्या हिश्श्यातून काहीनाकाही आपल्या गरजेसाठी घेतात. तीन मण तांदळातून अर्धा मण काढला जातो. गव्हाच्या पिठात भुसा आणि माती सुद्धा टाकली जाते. चांगल्या भाज्या अधिकाऱ्यांसाठी बाजूला काढल्या जातात, साध्या भाजीतला सुद्धा चांगला भाग इतरच कोणी घेऊन जाते आणि कैद्यांच्या वाटेला येते फक्त झाडपत्ती. तेल, दुध, तूप, गूळ—अशा सर्व वस्तूंमध्ये सुद्धा याच प्रकारची लूट आहे. सिगारेट आणि तंबाखूवर बंदी आणून सरकार कैद्यांना संयमाचे धडे देऊ पहाते, पण याचा परिणाम फक्त इतका आहे की पैशावाल्या कैद्यांना या गोष्टी थोड्या महाग मिळतात. खरेतर ज्या कैद्याकडे लाच द्यायला पैसे आहेत, त्याला जेल मध्येही सर्व सुविधा उपलब्ध होतात. अशा वातावरणात खरंच काही सुधार होईल?

अनुवाद: प्रवीण सोनवणे

(पुढील अंकामध्ये याच लेखाचा राहिलेला भाग: तुमच्या न्यायाचा ऱ्हास)

### लेखकाचा परिचय

राहुल सांकृत्यायन (1893-1963) खऱ्या अर्थाने जनतेचे लेखक होते. ते आजच्यासारख्या तथाकथित प्रगतिशील लेखकांसारखे नव्हते, जे जनतेच्या जीवन आणि संघर्षापासून अलिप्त राहून आपापल्या महालांमध्ये बसून कागदावर प्रकाश टाकत असतात. जनतेच्या संघर्षाचे मोर्चे असोत वा सरंजामदार-जमीनदारांच्या शोषण-दमनाच्या विरुद्ध शेतकऱ्यांच्या संघर्षाचा लढा असो, ते नेहमीच पहिल्या फळीत उभे राहिले. अनेक वेळा तुरुंगात गेले, यातना सहन केल्या. जमीनदारांच्या भाडोत्री गुंडांनी त्यांच्यावर प्राणघातक हल्लासुद्धा केला, परंतु स्वातंत्र्य, समानता आणि मानवी स्वाभिमानासाठी ते ना कधी संघर्षातून मागे हटले आणि ना कधी त्यांची लेखणी थांबली.

जगभरातील 26 भाषा अवगत असलेल्या राहुल सांकृत्यायन यांच्या अचाट बुद्धीचे अनुमान यावरूनसुद्धा लावता येऊ शकते की, ज्ञान-विज्ञानाच्या अनेक शाखा, साहित्याच्या अनेक प्रकारांमध्ये त्यांनी हातोटी मिळवली होती. इतिहास, तत्वज्ञान, पुरातत्वशास्त्र, मानववंशशास्त्र, साहित्य, भाषा-विज्ञान इ. विषयांवर त्यांनी अधिकारवाणीने लेखन केले. बौद्धिक गुलामी, तुमचे अध:पतन, पळू नका-जगाला बदला, तत्वज्ञान-संदर्भ, मानवसमाज, वैज्ञानिक भौतिकवाद, जय यौधेय, सिंह सेनापती, साम्यवादच का?, बावीसावे शतक इ. रचना त्यांच्या महान प्रतिभेची ओळख स्वत:हूनच करून देतात.

राहुल देशातील दलित-शोषित जनतेला हर-तऱ्हेच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी लेखणीचा हत्यारासारखा वापर करायचे. त्यांचं म्हणणं होतं की, "साहित्यकार जनतेचा जबरदस्त सहकारी, सोबतच तो त्यांचा नेता (पुढारी) आहे. तो सैनिक आहे आणि सेनापतीसुद्धा."

राहुल सांकृत्यायन यांच्यासाठी जीवनाचं दुसरं नाव गती होतं आणि मरण किंवा स्तब्धतेचं दुसरं नाव होतं गतिरोध. यामुळेच अगोदरच तयार असलेल्या मार्गावर चालणे त्यांना कधीही आवडले नाही. ते नव्या मार्गाचे संशोधक होते. परंतु फिरणे म्हणजे त्यांच्यासाठी फक्त भूगोलाची ओळख करून घेणे नव्हते. ते सुदूर देशांतील जनतेचं जीवन आणि त्यांच्या संस्कृतीशी, त्यांच्या जिजीविषेशी ओळख करून घेण्यासाठीचं फिरणं होतं.

समाजाला मागे ढकलणाऱ्या हरतऱ्हेच्या विचार, रुढी, मूल्ये, मान्यता-परंपरांच्या विरुद्ध त्यांचे मन अतिशय तिरस्काराने भरलेले होते. त्यांचं संपूर्ण जीवन आणि लिखाण याविरुद्ध विद्रोहाचं जितं-जागतं उदाहरण आहे. यामुळेच त्यांना महाविद्रोहीसुद्धा म्हटले जाते. राहूल यांची ही वेगळी रचना आजसुद्धा आपल्या समाजातील प्रचलित रुढी-परंपरांच्या विरुद्ध तडजोड विहीन संघर्षाची आरोळी आहे.

# सामान्य लोकांमधील पुरुषसत्तावादी विचार आणि कष्टकरी महिलांच्या घरेलू गुलामीच्या संघर्षाबद्दल कम्युनिस्ट दृष्टिकोण

पान 10 वरून

राहतात. मी कामगारांचे जीवन जाणतो, आणि फक्त पुस्तकांतून नाही. स्त्रियांमध्ये आपले कम्युनिस्ट काम, आणि सामान्यत: आपले राजकीय काम, पुरुषांकडून अधिक शिक्षणाची मागणी करते. आपल्याला जुन्या दास-स्वामी दृष्टीकोणाला संपवावेच लागेल, पार्टी मध्ये आणि जनसमुदायामध्ये सुद्धा. हा आपल्या राजकीय कार्यभारांपैकी एक आहे, एक असा कार्यभार ज्याची तितकीच तातडीने गरज आहे जितकी कष्टकरी महिलांमध्ये पार्टी कार्याच्या गहन सैद्धांतिक आणि व्यावहारिक प्रशिक्षणाने सज्ज स्त्री आणि पुरुष कॉम्रेड्सचा एक स्टाफ बनवण्याची."

सोवियत रशियातील तात्कालिक स्थितींबद्दल माझ्या (क्लारा झेटकीनच्या-अनुवादक) प्रश्नांना उत्तर देताना लेनिनने म्हटले:

"सर्वहारा अधिनायकत्वाचे सरकार—स्पष्ट आहे की कम्युनिस्ट पार्टी आणि ट्रेड युनियन्स सोबत मिळून—स्त्री-पुरुषांच्या मागासलेल्या विचारांवर विजय मिळवण्यासाठी आणि अशाप्रकारे गैरकम्युनिस्ट मानसिकतेला संपवण्यासाठी सर्व प्रकारचे प्रयत्न करत आहे. सांगायची गरज नाही की कायद्यासमोर सर्व स्त्री आणि पुरुष पूर्णत: समान आहेत. या कायदेशीर समानतेला प्रभावी बनवण्याची खरी इच्छा प्रत्येक क्षेत्रात स्पष्ट बघता येईल. आम्ही अर्थतंत्र, प्रशासन, कायदे बनवणे आणि सरकार चालवणे यामध्ये महिलांना सामील करत आहोत. त्यांच्यासाठी सर्व अभ्यासक्रम आणि शिक्षणसंस्थांचे दरवाजे खुले आहेत, जेणेकरून आपल्या व्यावसायिक आणि सामाजिक क्षमतांना त्या सुधारू शकतील. आम्ही सामुदायिक स्वयंपाकघर, सार्वजनिक भोजनालय, लॉंड्री आणि दुरुस्तीची दुकाने, बालवाड्या, शिशुशाळा(किंडरगार्टेन), बालगृह तसेच सर्व प्रकारच्या शैक्षणिक संस्था संघटित करत आहोत. थोडक्यात, आम्ही लोक घरेलू आणि शिक्षणासंबंधी कामांना व्यक्तिगत गृहस्थीच्या कक्षेतून समाजाच्या कक्षेमध्ये आणण्याच्या आपल्या कार्यक्रमाच्या शर्तींना पूर्ण करण्यासाठी पुरेसे गंभीर आहोत. अशाप्रकारे महिला आपल्या जुन्या घरेलू गुलामीतून आणि आपल्या पतीवरच्या प्रत्येक प्रकारच्या अवलंबित्वातून मुक्त होत आहेत. त्यांना सक्षम बनवले जात आहे जेणेकरून त्या समाजातील आपली क्षमता आणि आवडीनुसार आपली भूमिका पूर्णत: निभावू शकतील. मुलांना घराच्या तुलनेत, विकासाच्या अजून चांगल्या संधी दिल्या जात आहेत. आमच्याकडे स्त्री कामगारांसाठी जगातील सर्वाधिक प्रगतीशील

पान 7 वर

# पुण्यात ॲमेझॉन च्या कामगारांचा नैमित्तिक संप

## वितरण (डिलिव्हरी) क्षेत्रातील कामगार वर्गाने संघटित होण्याची गरज अधोरेखित

✍ अभिजित

पुणे शहरात 15 मार्चच्या आसपास जवळपास 3 ते 4 दिवस वितरण (डिलिव्हरी) करणाऱ्या मेझोन कंपनीच्या कामगारांचा संप झाला. त्यांच्या मजुरी मध्ये झालेल्या प्रचंड कपातीच्या विरोधात त्यांचे हे स्वयंस्फूर्त आंदोलन झाले. पूर्वी 35 रुपये असलेला डिलिव्हरीचा दर आता 10 रुपयांवर आलेला आहे, ज्यामुळे कामगारांचे उत्पन्न महिना 10-12 हजारांवर येणार आहे. या आंदोलनाच्या निमित्ताने, सतत विस्तारित होत चाललेल्या डिलिव्हरी कामगारांच्या क्षेत्राकडे पाहता आणि या अगोदर झालेल्या अनेक अशा स्वत:स्फूर्त आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर या क्षेत्रातील कामगारांनी संघटित होण्याची गरज पुन्हा अधोरेखित होत आहे.

झोमॅटो, स्विगी, मेझोन, फ्लिपकार्ट, बिगबास्केट, ग्रोफर्स, नेचर्स बास्केट, डंझो, रॅपिडो, अर्बन कंपनी, हाऊसजॉय, ओला, उबर यासारख्या कंपन्याच नाही तर कुरीयर, मोठी हॉटेल्स पासून ते छोट्या दुकानदारांपर्यंत आज मालाच्या 'होम डिलिव्हरी'चे म्हणजेच घरपोच सेवेचे क्षेत्र विस्तारलेले आहे. या क्षेत्रामध्ये किती लोक काम करतात याची आधिकारिक आकडेवारी उपलब्ध नाही. काही अंदाजांनुसार फक्त प्रवासी वाहतुकीमध्येच 15 लाख लोक ड्रायव्हिंग करत आहेत, परंतु मे 2019 मध्ये उबरने जाहीर केले होते की फक्त भारतात त्यांच्या 30 लाख कार फिरत आहेत. निती आयोगाच्या एका वक्तव्यानुसार ओला आणि उबर यांनीच 2014 पासून अनुक्रमे 10 लाख आणि 22 लाख 'रोजगार' निर्माण केले आहेत (कंपन्या या कामांना रोजगार आणि काम करणाऱ्यांना कामगार मानत नाहीत ही बाब वेगळी, पण मोदी सरकारचा आणि सत्याचा संबंध कधी होता का?). अशा सर्व आकड्यांवरून, देशाचा विचार करता सर्व कंपन्या धरून, काही कोटी कामगार तर नक्कीच या क्षेत्रात गुंतलेले आहेत असे म्हणू शकतो.

या सर्व कामगारांना इंग्रजीत 'गिग वर्कर्स' असे म्हटले जाते ('गिग' मध्ये डिलिव्हरी शिवाय इतरही काही क्षेत्र येतात). विशिष्ट किंवा थोड्या काळासाठीच असलेल्या कामांना 'गिग' म्हटले जाते. या नावावरूनच लक्षात यावे की ज्यांना कायमस्वरूपी कामाची खरोखर गरज आहे असे कोटयवधी कामगार जीवन जगण्याचा मार्ग म्हणून ज्या कामाकडे बघतात त्याची व्याख्याच तात्पुरते काम अशी आहे!

### डिलिव्हरी कामगारांची बिकट स्थिती

डिलिव्हरी कामगारांना (ज्यांना 'डिलिव्हरी बॉय' असे म्हटले जाते, जेव्हा की वास्तवात हे सर्व कामगार आहेत!) अनेकदा सकाळी 7 वाजल्यापासूनच कामाला लागावे लागते. म्हणायला आपल्या मर्जीने कराल तितके काम आहे, परंतु कुटुंब चालवायचे असल्यास **12-15 तास काम केल्याशिवाय योग्य उत्पन्न मिळणेच शक्य नाही** ही स्थिती असते. ग्राहकांचे नखरे आणि मनस्ताप याच कामगारांना भोगावे लागतात. प्रवासातल्या अडचणी, हवामान, ट्रॅफिक, घर न सापडणे, इत्यादी विविध कारणांमुळे डिलिव्हरी उशिरा होऊ शकते पण या सर्वांचा **भुर्दंडही अनेकदा कामगारांच्याच माथी** मारला जातो. जेव्हा कमी डिलिव्हरी असतात तेव्हा तर कंपन्या अनेकदा प्रति डिलिव्हरीच्या दरानेच कामगारांना पैसे देतात, परंतु त्यांना **संपूर्ण दिवसभर मात्र गुंतून रहावेच** लागते आणि जास्त डिलिव्हरी असतात तेव्हा मात्र कितीही ताण आला तरी वेळेत डिलिव्हरी पूर्ण करण्याचा दबाव मात्र टाकला जातोच. काम जाण्याची टांगती तलवार या कामगारांच्या डोक्यावर नेहमीच टांगलेली असते. प्रत्येक ग्राहकाने '5-स्टार' द्यावेत आणि उत्पन्नाचा भुर्दंड पडू नये याकरिता अनेकदा कामगारांना ग्राहकांच्या विनवण्या कराव्या लागतात. डिलिव्हरी करणाऱ्यांच्या संपूर्ण प्रवासात त्यांच्यावर जीपीएस द्वारे कंपन्या पाळत ठेवतात. ही आहे कामाची स्थिती.

या कंपन्या कामगारांची विविध 'आकर्षक' योजनांच्या नावावर **कशी पिळवणूक करतात याचे एक उदाहरण पाहूयात.** झोमॅटो ने जून 2020 मध्ये दिल्लीमध्ये 'जास्त' कमाईची एक योजना कामगारांपुढे मांडली. महिन्याला 'किमान' 20,000 रुपये कमावण्यासाठी काय अटी ठेवल्या होत्या ते पाहूयात: **आठवड्याला किमान 65 तास काम** (म्हणजे 1 दिवस सुट्टीचा सोडला तर, रोज जवळपास 11 तास), शुक्रवार-शनिवार-रविवार मिळून किमान 33 तास (म्हणजे हे तीन दिवस सक्तीने किमान 11 तास काम), सायंकाळी 7 ते 11 दरम्यान किमान 24 तास (म्हणजे किमान 6 दिवस काम करावेच लागेल), ऑर्डर नाकारणे किंवा जास्तीत जास्त एक रद्द (हे तर ग्राहकांच्या मर्जीची किंमत कामगारांकडून वसुलणे झाले!), 5 टक्क्यांपेक्षा कमी 'निवांत' तास, इत्यादी. कामाचा शारीरिक ताण तर आहेच, अशाप्रकारच्या अटींची पूर्तता करणे कामगारांना किती **मानसिक तणाव** घडवत असेल याची कल्पनाही त्रासदायक आहे. थोडक्यात कामगारांच्या श्रमशक्तीला उसाच्या चरकात पिळवटून काढून झोमॅटो पैसे कमावत आहे. **8 तासांच्या कामाचा कायदा तर या कंपन्यांनी सुरुवातीपासूनच धाब्यावर बसवला आहे.**

'टीस' संस्थेने दिल्लीमध्ये केलेल्या एका संशोधनानुसार जवळपास यापैकी **47 टक्के कामगार रोज 12 तास काम करतात,** तर 18 टक्के कामगार 15 तास काम करतात. 60 टक्क्यांपेक्षा जास्त कामगार आठवड्यातील सातही दिवस काम करतात. यापैकी 8 तासांपर्यंत काम करणारे कामगार महिन्याला फार तर 12,000 रुपयांपर्यंत कमावतात. 25,000 रुपये किंवा जास्त कमावण्यासाठी दिवसा 12-15 तास काम नक्कीच करावे लागते आणि सरासरी उत्पन्न 15,000 रुपयांच्या घरातच आहे. कंपन्या अपघाती विमा देण्याचा दावा करत असल्या तरी अत्यंत कमी कामगारांपर्यंत त्याची पोहोच आहे असेच दिसून आले आहे. अशा अवघड कामाच्या स्थितींचा परिणाम आहे की 72 टक्के कामगार 6 महिने ते 1 वर्षातच काम सोडण्याचा विचार करू लागतात. मार्च 2019 मध्ये 'फेअरवर्क' द्वारे प्रसिद्ध एका अहवालानुसार 'गिग वर्कर्स'ना अनेक कामांच्या तुलनेत सर्वाधिक वाईट स्थितीत काम करावे लागते; आणि ओला, उबर, स्विगी, झोमॅटो, मेझॉन, बिगबास्केट, डंझो सारख्या कंपन्या तर यात सर्वाधिक वाईट गणल्या जातात.

**पूर्णवेळ याच कामाला द्यावा लागला, तरी कंपनीच्या दृष्टीने हे कामगार, 'कामगार' नसतातच, तर "स्वतंत्र स्वरोजगारी व्यक्ती" असतात आणि त्यामुळेच कंपन्यांकडे वास्तवात या कामगारांची काहीच जबाबदारी उरत नाही.** यांना कामावरून काढून टाकण्यासाठी कंपनीला कोणतीही कायदेशीर कृती करावी लागत नाही. **मॅनेजर्सद्वारे किंवा अनेकदा कंप्युटर प्रोग्राम्सद्वारे संचालित पच त्यांचे 'आयडी' 'ब्लॉक' करतात आणि कामगाराला काम करणे अशक्य केले जाते. ही आहे कामावरून काढण्याची पद्धत.** नियमितपणे ए.आय. (कंप्युटर प्रोग्राम्सद्वारे कृत्रिम बुद्धिमत्ता) वापरून या कंपन्या अनेक माणसांचे काम नियमितपणे कालबाह्य करत चालल्या आहेत, आणि लोकांना कामावरून काढले जात आहे. तसे तर या कंपन्या ग्राहकांकडून डिलिव्हरीचे पैसे घेतातच, पण ए.आय. कंप्युटर प्रोग्राम वापरून दोन-तीन डिलिव्हरी ज्या जवळच्या आहेत, त्या एकत्र केल्या जातात आणि कामगारांचे पैसे कमी केले जातात. पगारी सुट्ट्या, कामाचे ठरलेले तास, आरोग्य वीमा, आरोग्य सुविधा, कामाची निश्चितता, ओव्हरटाईम असे जवळपास कुठलेच फायदे या कामगारांना दिले जात नाहीत. सर्वच कामगारांना वाहन तर स्वत:चेच वापरावे लागते आणि वाहनांच्या कर्जाचे हप्ते फेडून खर्चायला पैसे राहतील इतके कमावण्यासाठी 12-15 तास काम करणे अगदी सामान्य बाब झालेली आहे.

**वास्तव हे आहे की डिलिव्हरी च्या या क्षेत्रात तरणोपाय झाला म्हणूनच कामगार काम करत असतात.** या क्षेत्रामध्ये कुठल्याही प्रकारच्या पदोन्नतीची आशा ते ठेवू शकत नाही. मॅनेजर सारखी पदे सुद्धा आता रद्द होऊन ते काम कंप्युटर प्रोग्रामद्वारे करवण्याकडे वाटचाल चालू आहे आणि मॅनेजर सारखे काम करण्यासाठी लागणारी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता सुद्धा बहुसंख्यांकडे नसतेच.

सुरुवातीच्या काळात 'इंसेंटीव्ह' (प्रोत्साहन भत्ता) मिळत असल्यामुळे लाखो लोक ओला, उबरकडे वळले. अनेकांनी नोकऱ्या सोडल्या, जमिनी विकल्या आणि कर्ज घेतल्या. परंतु अपेक्षेप्रमाणे आता ड्रायव्हर्सच्या खिशातून कंपन्यांनी वसुली सुरू केली आहे. **अगोदर 10 टक्के कमिशन घेणाऱ्या आणि त्यापेक्षा जास्त इंसेटीव्ह देणाऱ्या कंपन्यांनी आता 25 ते 35 टक्क्यांपर्यंत कमिशन वळते करणे चालू केले आहे.** अनेकांना गाड्यांचे कर्जाचे हप्ते भरणे मुश्किल झाले आहे. अतिरिक्त उत्पन्न, इंसेंटीव्हस करिता **दिवसाला 16-18 तासही काम करणारे अनेक ड्रायव्हर्स आहेत ज्यांच्या आरोग्याचे प्रश्न गंभीर बनणे सुरू झाले आहे.** उदाहरणार्थ रु. 2000 इंसेंटीव्ह मिळवण्यासाठी 4 दिवसात 60 ट्रिप्स सारखे काम करावेच लागते. दिवसाला हजार रुपये कमावले तर त्यातले जवळपास 800 रुपये तर गाडीच्या कर्जाच्या हप्त्यालाच द्यावे लागतात अशी अनेकांची स्थिती झाली आहे. इंसेंटीव्ह मागची फसवेगिरी लक्षात येऊ लागल्यामुळे अनेक कामगार आता पगाराच्या किमान ठरलेल्या रकमेत वाढीची मागणी धरू लागले आहेत.

लॉकडाऊनच्या काळात 'आघाडीचे लढवय्ये' म्हणून या कामगारांचे कौतुक वरवर झाले असले, तरी वास्तवात अनेक ठिकाणी कंपन्यांनी कामगारांना कामावरून काढले, पगार कमी केले गेले, लॉकडाऊनच्या निर्बंधांना आणि पोलिसी दमनाला तोंड द्यावे लागले. काहींच्या गाड्या जप्त केल्या गेल्या, ज्या त्यांना स्वत:लाच सोडवाव्या लागल्या. लॉकडाऊनच्या काळात स्विगी कंपनीने कामगारांचा डिलिव्हरीचा दर 57%नी कमी करून रु. 15वर आणला. दिल्ली, चेन्नई आणि हैदराबाद मध्ये अनेकांनी याकाळात काम सोडले आणि संपावरही गेले. परंतु त्यांचे म्हणणे ऐकण्यासाठी कोणीच नव्हते. दिल्लीमध्ये तर अशा कामगारांच्या विरोधात कंपन्यांनी बाऊंसर्सचाही वापर केला; तर काहींनी कामगारांना नेहमीसाठी कामावरून 'ब्लॉक' केले. या काळात ज्यांना कोरोना झाला, त्यांच्यासाठी कंपन्यांनी कसल्याही तरतूदी केल्या नाहीत. इतरांना अन्न पोहोचवले म्हणून ज्या कामगारांचे 'कौतुक' केले गेले, त्यापैकी हजारो कामगारांची कुटुंब लॉकडाऊनमध्ये घटलेल्या उत्पन्नामुळे उपाशी राहिली!

### आतापर्यंतच्या आंदोलनांचा आढावा

ऑक्टोबर 2018 मध्ये उबरच्या ड्रायव्हर्सनी संप करण्याचा प्रयत्न केला, जो एकजुटीच्या अभावाने निष्फळ राहिला. इतकेच नाही तर यानंतर प्रति किलोमीटर दर वाढवण्याची मागणी दुरच, कंपनीने उलट दर अजून कमी करवले आणि भांडवलाच्या क्रूरतेची अजून एक साक्षच दिली. मार्च 2018 मध्ये सुद्धा उबर ड्रायव्हर्सनी देशव्यापी संप करण्याचा प्रयत्न केला होता. सप्टेंबर 2019 मध्ये मुंबई आणि बंगळुरू मध्ये झोमॅटो च्या कर्मचाऱ्यांनी 40 रुपयांचा दर 30 रुपयांवर आल्याच्या विरोधात संप केला. 8 जानेवारी 2020 रोजी देशव्यापी बंदचे आवाहन सर्व कामगार संघटनांनी केले होते. यामध्ये मात्र डिलिव्हरी कामगारांचा सहभाग नाममात्र राहिला. लॉकडाऊनच्या काळात जून 2020 मध्ये बंगळुरू मध्ये विविध अन्नवितरक कामगारांनी सरकारी मदतीची मागणी करत आंदोलन केले. सप्टेंबर 2020 मध्ये स्विगीचे कामगार चेन्नई, हैदराबाद आणि दिल्ली (नॉयडा) येथे डिलिव्हरीचे दर 35 रुपयांवरून 15 रुपयांवर आल्यामुळे संपावर गेले.

**अशातच पुण्यामध्ये जेव्हा डिलिव्हरी कामगारांचे पगार जवळपास तीनपटीने कमी करण्याचे काम जेव्हा मेझॉन ने आरंभले तेव्हा कामगारांनी स्वत:स्फूर्तपणे काम न करण्याचे धोरण स्विकारले.** कोणतीही युनियन नसताना, संघटित नेतृत्व नसताना कामगारांनी आपल्या आंतरिक वर्गचेतनेतून हे पाऊल उचलले. यानंतर एका भांडवली पक्षाच्या मध्यस्थीने कंपनीशी वाटाघाटी करण्याची

पान 10 वर

• संपादक मंडळ – निखील एकडे, बबन ठोके • संपादकीय कार्यालय- रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग, 7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043
मो. नं. 8669735643 , 9619039793 • जागृति प्रिंटर्स, 12-ए, ग्राउंड फ्लॉर, भायखला सर्विसेज इंडस्ट्रीज, भायखळा, मुंबई येथे मुद्रित